CMYK






अस्सल सोलापुरी


# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड


दसरा-विजयदशीनिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!

धम्मचक्र प्रवर्तन
दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



www.surajyadigital.com मंगळवार, दि. २४ ऑक्टोबर २०२३ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# पवारांची दिशा अचानक बदलली, सुशीलकुमारांनी पाठ फिरवली

## महाविकास आघाडीची बैठक 'फेल' ठरली

✔ सुराज्य/पंढरपूर

**पंढरीत सोमवारी राजकीय मांदियाळी भरणार होती.सोलापूर आणि माढा लोकसभा मतदार संघाची रणनीती ठरवण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांची याठिकाणी बैठक होणार होती.ज्येष्ठ नेते शरद पवार आणि ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्यासह उद्धव ठाकरे गटाचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित राहाणार होते.शहरात स्वागताचे बॅनर्स झळकले होते. श्रेयस पॅलेसचा परिसर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी फुलून गेला होता.पोलिसांचा ताफाही जमला होता. सर्वांना प्रतिक्षा होती,पवार-शिंदे यांच्या आगमनाची. नियोजित बाराची वेळ निघून गेली.पॅलेसमध्ये चुळबुळ सुरु झाली.वाऱ्यासारखी एकच बातमी आली आणि उत्साहावर पाणी फेरले.पवारांचा दौरा रद्द झाल्याची ती न्यूज होती.सुशीलकुमार यांनीही सोलापुरातच थांबण्याचा निर्णय घेतला.बैठक फेल ठरली.पदाधिकारी आणि कार्यकर्ते विन्मुख होवून बाहेर पडले.**


महाविकास आघाडीच्या बैठकींचे नियोजन आठवडाभरापूर्वीच ठरले होते. सोलापूर लोकसभा मतदार संघासाठी महाविकास आघाडीचा मार्ग एकदम सुकर आहे. सुशीलकुमार यांच्या कन्या आ.प्रणिती शिंदे यांची उमेदवारी फिक्स असल्याचे मानले जात आहे.इथे त्यांना कुणाचा विरोध नाही, पण माढा मतदार संघात शरद पवार गटाची अवस्था बिकट आहे. अजित पवार यांनीच पक्ष सोडून सत्तेत गेल्यामुळे शरद पवार यांच्यापुढे मोठी अडचण निर्माण झाली आहे. सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघ एकेकाळी काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या ताब्यात होता. मात्र मागील काही निवडणुकांपासून हे मतदारसंघ काँग्रेस, राष्ट्रवादीच्या ताब्यातून गेले आहेत. २००९ च्या निवडणुकीमध्ये स्वतः शरद पवार हे माढा लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले होते. तर सुशील कुमार शिंदे यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघाचा अनेक वर्ष प्रतिनिधीत्त्व केले आहे.

आपल्या हक्काचे मतदारसंघ गेल्याने या दोन्ही नेत्यांनी माढा आणि सोलापूर मतदारसंघाकडे आपले लक्ष केंद्रीत केले होते. त्याच अनुषंगाने आजच्या महाविकास आघाडीच्या बैठकीत चर्चा होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र शरद पवार यांचा दौरा अचानक पुढे ढकलल्याने सुशील कुमार शिंदे यांनी देखील कार्यक्रमाकडे पाठ फिरवली.

इंडिया आघाडीच्या कोअर कमिटीच्या बैठकीमुळे पवारांचा पंढरपूर दौरा पुढे ढकलल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर जिल्हा निरीक्षक शेखर माने यांनी दिली आहे. शरद पवार यांचा दौरा का पुढे ढकलला याची मला माहिती नाही, पण ही बैठक एकत्रित होती. ते नाहीत म्हटल्यानंतर मी देखील गेलो नाही, असे सुशीलकुमार शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### कसा होता नियोजित दौरा?





सोमवारी शरद पवार हे सकाळी हेलिकॉप्टरने पावणे दहा वाजता माढा तालुक्यातील कापसेवाडी येथे येणार होते.द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचा मेळावा घेणार होते. यानंतर ते दुपारी बारा वाजता पंढरपूरला येणार होते. काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे हे देखील बारा वाजता सोलापूर येथून पंढरपूरला पोहचणार होते. यांनतर या दोन मोठ्या नेत्यांच्या उपस्थितीत श्रेयस पॅलेस येथे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्या समवेत लोकसभा निवडणुकीसाठी बैठक होणार होती. शिवसेनेच्या नेत्यांनाही निमंत्रित केले होते.




### थेट पुण्याला

शरद पवार यांच्या माढा दौऱ्याची चर्चा अनेक दिवसांपासून होती. आजच्या दौऱ्याची संपूर्ण तयारी देखील आयोजकांकडून करण्यात आली होती. मात्र शरद पवारांचा दौरा अचानक रद्द झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. शरद पवार हे रविवारी बारामतीत होते. बारामतीतून सोलापूरला न जाता ते थेट पुण्याला गेले. दौरा का रद्द करण्यात आला, याची कोणतेही कारण समोर आले नाही. अचानक दौरा रद्द झाल्याने कार्यकर्ते देखील संभ्रमात पडले. इंडिया आघाडीतील काँग्रेस आणि अखिलेश यादव यांच्यात संघर्ष सुरू आहे. त्यावर विचानविनिमयासाठी सोमवारी मुंबईत अचानक बैठक ठेवली गेली. त्यासाठी पवारांना तातडीने तिकडे जावे लागले,असे सांगण्यात आले.

### गोपनीय बैठक...

महाविकास आघाडीच्या बैठकीला येणाऱ्या व्हीआयपींसाठी काँग्रेसचे निष्ठावंत नेते आदित्य फत्तेपूरकर यांच्या निवासस्थानी भोजनाचा बेत ठेवण्यात आला होता. पवार-शिंदे हे आले नाहीत.त्यामुळे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीच या भोजनाचा आस्वाद घेतला. एका सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की, माढ्याची उमेदवारी रासपचे महादेव जानकर यांना देण्याचा विचार पवारांच्या डोक्यात घोळत आहे. जानकर यांच्या पक्षाला आघाडीत घेण्याचा पवारांचा प्लॅन आहे. भोजनाच्या ठिकाणीच जानकर यांच्याविषयीची चर्चा होणार होती. परंतु पवार न आल्याने हा प्लॅन सक्सेस झाला नाही.

## पोलीस अधिकाऱ्यावर हल्ला; १५ कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता

**डॉल्बी आणि नाचगाणी बंद करण्याच्या कारणावरुन झाला होता वाद**

✔ सुराज्य/सोलापूर

डॉल्बी आणि नाचगाणे बंद करण्याच्या कारणावरुन पोलीस अधिकाऱ्यांशी हुज्जत घालून त्यांच्यावर हल्ला करून मारहाण केल्याच्या आरोपातून सोलापुरातील अतीरिक्त सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी सबळ पुराव्याअभावी १५ जणांची निर्दोष मुक्तता केली.

पाणीवेस, दत्त चौक भागातील कार्यकर्ते लक्ष्मीकांत ऊर्फ सागर सुभाष-सिरसट, निलेश शंकर काटकर, सुरज रमेश पवार, गणेश मोहन पवार, तुषार बंडोबा पवार, आकाश शिवशंकर चाटी, विक्की ऊर्फ उमाकांत शिवशंकर चाटी, ज्ञानेश्वर विलास कोटमळे, किसन किसन गडदूर, शुभम राजशेखर वागदुर्गी, प्रसाद पांडुरंग पवार, भाऊकांत शहाजी पवार (जाधव), रोहित सुभाष सातपुते, अभिजीत विजयकुमार हविनाळ, निखिल सुनिल भोसले या सर्वांनी डॉल्बी, नाचगाणे बंद करण्यावरून पोलीस अधिकाऱ्याशी हुज्जत घातली होती.



दि. ६ जानेवारी २०१५ रोजी पोलिसांना डोणगांव रोडवरील एका फार्म हाऊसवर डॉल्बीचा आवाज ऐकू आल्याने रात्री गस्तीवर असणारे, पोलीस उपनिरीक्षक विश्वास भाबड यांना वानकर फार्म हाऊसवर २० ते २५ तरुण डॉल्बीवर मद्यधुंद अवस्थेत नाचत असताना आढळून आले. त्यांना डॉल्बी बंद करण्यास सांगितले असता त्यांनी उलट पोलिसांना मारहाण केली. याप्रकरणी त्यांच्यावर सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्या १५ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. त्याची सुनावणी अतीरिक्त सत्र न्यायाधिश राणे यांच्या समोर झाली. सरकार पक्षाने एकूण १० साक्षीदार तपासले. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड.शशी कुलकर्णी, स्वप्निल सरवदे, रणजित चौधरी, प्रसाद अग्निहोत्री, आशुतोष पुरवंत यांनी काम पाहिले. सरकार पक्षातर्फे ॲड. देशपांडे यांनी काम पाहिले.






**सोलापूर : विजयादशमी आणि दसऱ्यानिमित्त सोलापुरातील बाजारपेठे सजली आहेत. विविध प्रकारची रंगबेरंगी फुले, आपट्यांची पाने, शमीची पाने, केळीची पाने व इतर साहित्यांच्या खरेदीसाठी नागरिकांनी टिळक चौक परिसरात मोठी गर्दी केल्याचे दिसून आले. टिळक चौक परिसरात झेंडुची फुले खरेदी करताना नागरिक....**

## महिला फौजदारास मारहाण; महिलेवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर


नवरात्रोत्सवानिमित्त रूपाभवानी देवींच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना विरुद्ध दिशेने नको सरळ या, असा सल्ला देणाऱ्या महिला फौजदारास महिला भाविकांकडून रागाने हातातली वस्तू भिरकावून मारली.यात फौजदार महिला जखमी झाल्या. दुपारी बाराच्या सुमारास रुपाभवानी मंदिरात ही घटना घडली. याप्रकरणी कशीश ओंकार वाले (वय-२३, सम्राट चौक) या महिलेविरुद्ध गुन्हा दाखल झाला.




याप्रकरणी महिला फौजदार संजीवनी संगेश व्हट्टे (वय-३५) यांनी फिर्याद दिली आहे. रविवारी व्हट्टे या रुपा भवानी मंदिरात बंदोबस्तासाठी कार्यरत होत्या. त्यांच्यासोबत अन्य महिला पोलीसही होत्या. दुपारी बाराच्या सुमारास यातील कशीश वाले ही महिला दर्शनासाठी विरुद्ध दिशेने येत असताना व्हट्टे यांनी तिला सरळ मार्गाने येण्यास सांगितले असता त्या महिलेने व्हट्टे यांच्या हातातील वस्तूने तोंडावर मारली. यात फौजदार महिलेच्या गळा, हातावर नखे ओरखटल्याने त्या जखमी झाल्या. तपास पोसई ताकभाते करीत आहे.

## अल्पवयीनमुलीवर दुष्कर्म; ट्रॅक्टर चालकास २५ वर्षांची सक्तमजूरी

✔ सुराज्य/सोलापूर



उसतोड कामगार आई-वडिलांसोबत आलेल्या अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन ट्रॅक्टर चालकाने तिच्याशी शारिरीक संबंध ठेवल्याचाआणि त्यातून तिला दिवस गेल्याच्या आरोप न्यायालयात सिध्द झाल्याने जिल्हा व सत्र न्यायाधीश-३ कविता डी.शिरभाते यांनी सतिश शिवाजी चव्हाण (रा.उमरगा) याला २५ वर्षे सक्त मजुरी आणि ५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. यातील फिर्यादी पिडीतांच्या कुटुंबियांसोबत ट्रॅक्टरवर चालक म्हणून काम करु लागला. पीडिता ही ११ फेब्रुवारी २०२१ रोजी अचानक त्या ठिकाणावरुन गायब झाली. पिडीतेच्या वडीलांनी दि.१२ फेब्रुवारी २०२१ रोजी पिडीता हरविल्याबाबतची फिर्याद दिली. त्यानंतर पिडीता ही दि.१८ एप्रिल २०२२ रोजी आरोपीसोबत मिळून आली.

त्यावेळी पिडीता ही ७ महिन्याची गर्भवती होती. त्यांनतर तपासीक अंमलदार यांनी गुन्ह्याची चौकशी करुन वैद्यकीय कागदपत्रांसह न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. याबाबत सरकारी वकील ॲड. प्रकाश एस. जन्नू यांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरुन विशेष न्यायाधीश श्रीमती कविता डी.शिरभाते यांनी अल्पवयीन पिडीतेवर आरोपीने लैंगिक अत्याचार केल्याचे ग्राह्य धरुन आरोपी सतिश शिवाजी चव्हाण यास अन्वये दोषी धरले.

या खटल्यात सरकार पक्षाच्यावतीने सहा. सरकारी वकिल ॲड. प्रकाश एस. जन्नू यांनी काम पाहिले. तर आरोपीच्यावतीने ॲड. अक्षय तोतला व ॲड. सतिश शेट्टी यांनी काम पाहिले. या प्रकरणाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी केला. कोर्ट पैरवी म्हणून पो.कॉ. डी.वाय. कोळी यांनी काम पाहिले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




बॉस, तो नविन मुलगा आपट्याची पाने घेऊन आलाय !!


कल्याण
880-67-566

मुंबई
---


## घरफोडीतील आरोपी १२ तासात जेरबंद; दीड लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**▸ एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी**

✔ सुराज्य/सोलापूर

घरफोडीतील आरोपींना अवघ्या बारात तासात जेरबंद करण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे.

घरफोड्यांचे सत्र वाढल्यामुळे चोरांना पकडण्यासाठी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून पेट्रोलिंग सुरु आहे. दागिने घेऊन पसार होणाऱ्या बालकाला आणि चोरीची बाईक विक्रीसाठी थांबलेला तरुण अशा दोघांना एमआयडीसी पोलिसांनी सापळा लावून जेरबंद केले.

यातील एक विधीसंघर्ष बालक असून, दुसऱ्या तरुणाचं नाव ईश्वर श्रीनिवास बिरु (वय-१९, शांतीनगर) असल्याचे समोर आले आहे. या दरम्यान, खबऱ्यामार्फत एक विधीसंघर्ष बालक घरफोडीतील ८५ हजारांची दागिने घेऊन जात असल्याची माहिती पोलीस अंमलदार वाघे यांना मिळाली. त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने, फौजदार विक्रम रजपूत यांना कल्पना देऊन सापळा लावला. त्याला पकडून त्याच्याकडून ३० हजारांचे सोन्याचे पेंडल, ५५ हजार रुपयांचे गंठण असा ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याळगी यांनी चोरीची मोटारसायकल विक्रीसाठी येणाऱ्याला ताब्यात घेतले. चौकशीअंती त्याचे नाव ईश्वर बिरु असल्याचे समजले. त्याच्याकडून ६० हजार रुपयांची चोरीतील मोटारसायकल पोलिसांनी जप्त केली.




## महिला ग्रामपंचायत सदस्यासह पतीला मारहाण

**परस्परविरोधी फिर्याद; सात जणांवर गुन्हा**

✔ सुराज्य/सोलापूर



ठेकेदारासोबत काम दाखविण्यासाठी आलेल्या महिला ग्रामपंचायत सदस्य आणि त्यांच्या पतीस धक्काबुक्की करून मारहाण करण्यात आली. ही घटना शिरपनहळळी येथील शिवशक्ती मंदिराजवळ घडली. या प्रकरणात वळसंग पोलिसांनी परस्पर विरोधी फिर्याद दाखल करून दोन्ही गटातील सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

प्रथमेश केदार कारंजे, मेघराज बिराजदार, कृष्णकांत बिराजदार, लक्ष्मण बिराजदार अशा पहिल्या गटातील गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. या संदर्भात ग्रामपंचायत सदस्य अश्विनी भैरवनाथ बिराजदार यांनी वळसंग पोलिसात फिर्याद दाखल केली. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे काम पाहण्यासाठी काही ठेकेदार शिरपनहळळी येथे आले होते. त्यावेळी वरील चौघांनी त्यांना मारहाण केली. प्रथमेश केदार कारंजे याने दिलेल्या फिर्यादीवरून भैरवनाथ गुरुसिद्ध बिराजदार, पिंटू बिराजदार, कुमार बिराजदार या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.तपास हवालदार बंदीछोडे करीत आहेत.

CMYK

# 'अपार'विषयी कुरकुर

'वन नेशन वन स्टुडंट आयडी' योजनेअंतर्गत देशभरातील शालेय विद्यार्थ्यांचा अपार क्रमांक तयार केला जाणार आहे. त्याबाबतचे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. त्यामुळे आता शाळा, शिक्षक, पालकांमध्ये 'अपार क्रमांका'ची चर्चा सुरू झालेली असणार. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने आता देशभरातील विद्यार्थ्यांचे 'अपार क्रमांक' (ऑटोमेटेड पर्मनंट ॲकॅडेमिक रेजिस्ट्री) तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. या अपार क्रमांकाद्वारे विद्यार्थ्यांना विशेष क्रमांक दिला जाईल. अपार क्रमांकातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक माहिती डिजिटल पद्धतीने साठवण्यात येऊन ऑनलाइन उपलब्ध राहील. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीवर देखरेख करता येईल. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण विभागाचे सचिव संजय कुमार यांनी राज्यांना विद्यार्थ्यांचे अपार क्रमांक तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांकडे 'युनिक आयडी' गरजेची मानून, विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकावरूनच पालकांच्या संमतीने 'अपार क्रमांक' तयार केला जाणार आहे. शाळा स्तरावर 'अपार क्रमांक' तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी पालकांना संमतिपत्र भरून द्यावे लागणार आहे. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार राज्याच्या शिक्षण विभागानेही अंमलबजावणी करण्याच्या सूचना शिक्षण आयुक्तांना दिल्या आहेत. युनिफाईड डिस्ट्रिक्ट इन्फर्मेशन सिस्टिमद्वारे (यूडायस) विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाची नोंदणी करण्यात येत आहे. त्याशिवाय आता स्वतंत्र अपार आयडी काढला जाणार आहे. आधार कार्ड किंवा आधार क्रमांक आणि अपार क्रमांक यात फरक आहे. 'वन नेशन वन स्टुडंट आयडी' योजनेअंतर्गत अपार क्रमांक आधार क्रमांकावरून तयार होणार आहे. म्हणजेच अपार क्रमांक हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ओळखीसाठी आहे. त्यामुळे अपार क्रमांकामध्ये परीक्षांचा निकाल, समग्र अहवाल, विद्यार्थ्यांने शैक्षणिक उपक्रमात केलेली कामगिरी, क्रीडा, कौशल्य प्रशिक्षण अशी सर्वंकष माहिती असेल. तसेच हा क्रमांक 'डिजिलॉकर'लाही संलग्न केलेला असेल. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची सर्व प्रमाणपत्रे ऑनलाइन उपलब्ध होऊ शकतील. साहजिकच प्रवेश प्रक्रिया सुलभ पद्धतीने होईल, असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. 'यूडायस प्लस' प्रणालीवरील आकडेवारीनुसार देशभरात २६ कोटी ५२ लाख ३५ हजार ८३० विद्यार्थी आहेत. तर राज्यात दोन कोटींहून अधिक विद्यार्थी आहेत. अपार क्रमांक विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकावरून तयार करण्यात येणार आहे. मात्र, अनेक विद्यार्थ्यांचे आधार कार्ड म्हणजेच आधार क्रमांक नाही. अनेक विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड आणि स्टुडंट संकेतस्थळावरील माहितीत विसंगती आढळते. त्याशिवाय आधार क्रमांक जोडणीतील विविध अडचणी अद्याप संपलेल्या नाहीत. त्यामुळे जवळपास दोन वर्षांपासून आधार जोडणीचेच काम पूर्ण झालेले नसल्याने अपार क्रमांक तयार करण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. आधार क्रमांक, विद्यार्थी क्रमांक (स्टुडंट आयडी) हे 'युनिक' क्रमांकच आहेत. आता नव्याने अपार क्रमांकाची गरज काय? आधार आणि विद्यार्थी क्रमांकाचा विदा अधिकृत असताना आता तो अनधिकृत ठरणार का? असे प्रश्न आहेत. शिकवणे सोडून अशैक्षणिक कामांनी शिक्षक बेजार झाले आहेत, अपुऱ्या शिक्षक संख्येकडून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा ठेवली जात आहे, असे मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य प्रवक्ता महेंद्र गणपुले यांनी असे नमूद करून या व्यवस्थेला आक्षेप घेतला आहे. अपार क्रमांक तयार करण्यासाठी पालकांची संमती घेतली जाणार असल्याची, अपार क्रमांकातील विद्यार्थ्यांचा विदा सुरक्षित ठेवला जाण्याची हमी केंद्र सरकार देत असले तरी पालकांनी नकार देण्याचा अधिकार, विद्यार्थ्यांच्या विदा सुरक्षेबाबत आक्षेप नोंदवण्यात येत आहे. शिक्षण अभ्यासक किशोर दरक सांगतात की 'अपार क्रमांक आधार संलग्न असणार. पण आधारची सक्ती करता येणार नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. त्यामुळे आधारसक्ती केल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे उल्लंघन होते. अपार क्रमांकासाठी पालकांची संमती घेतली जाणार असली, तरी नकार देण्याची मुभा असल्याचे पालकांना सांगितले गेले पाहिजे. एखाद्या पालकाने संमती न दिल्यास त्याचे परिणाम काय होणार, हेही स्पष्ट करण्यात आलेले नाही. अपार क्रमांकात विद्यार्थ्यांची साठवलेली माहिती अन्य संस्थांना देताना ती खासगी शैक्षणिक संस्था, खासगी नोकरभरती करणाऱ्या कंपन्या, परदेशी संस्थाही असू शकतात. होत असलेला विरोध पाहाता सरकार काही वेगळी भूमिका घेतात काय? ते पहावे लागेल.




अध्यात्म

# विजयाची प्रेरणा देणारा दिवस

**आश्विन शुद्ध दशमी, म्हणजेच विजयादशमी. हिंदूंचा एक प्रमुख सण आणि साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असणाऱ्या दसरा (विजयादशमी) या सणाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. दुर्गानवरात्र संपल्यानंतर लगेच हा दिवस येतो; म्हणून याला 'नवरात्रीच्या समाप्तीचा दिवस' असेही मानतात. अगदी त्रेतायुगापासून हिंदू लोक विजयादशमी महोत्सव साजरा करत आलेले आहेत. विजयाची प्रेरणा देणारा आणि क्षात्रवृत्ती जागृत करणारा हा सण परस्परांतील प्रेम वृद्धिंगत करायलाही शिकवतो. दसऱ्याला सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजन आणि शस्त्रपूजा ही चार कृत्ये करायची असतात. तसेच या दिवशी सरस्वती पूजनही केले जाते. या सणाचे असलेले अनन्य साधारण महत्त्व लक्षात घेता याविषयीचा इतिहास, महत्त्व तसेच हा सण साजरा करण्याची पद्धत या लेखातून आपण थोडक्यात जाणून घेणार आहोत.**

---

**व्युत्पत्ती आणि अर्थ :** 'दसरा' शब्दाची एक व्युत्पत्ती दशहरा अशीही आहे. दश म्हणजे दहा आणि हरा म्हणजे हरल्या आहेत. दसऱ्याच्या आधीच्या नऊ दिवसांच्या नवरात्रात दाही दिशा देवीच्या शक्तीने भारलेल्या असतात. नियंत्रणात आलेल्या असतात, म्हणजेच दाही दिशांतील दिक्भव, गण इत्यादींवर नियंत्रण आलेले असते, दाही दिशांवर विजय मिळालेला असतो.

**इतिहास :** रामाचा पूर्वज 'रघु' या अयोध्याधिशाने विश्वजित यज्ञ केला. त्याने सर्व संपत्तीचे दान केले. नंतर तो एका पर्णकुटीत राहिला. कौत्स तिथे आला. त्याला गुरुदक्षिणा म्हणून देण्यासाठी १४ कोटी सुवर्णमुद्रा हव्या होत्या. रघु कुबेरावर आक्रमण करण्याला सिद्ध झाला. कुबेराने आपटा आणि शमी या वृक्षांवर सुवर्णाचा वर्षाव केला. कौत्साने केवळ १४ कोटी सुवर्णमुद्रा घेतल्या. बाकीचे सुवर्ण प्रजाजनांनी नेले. त्या काळापासून म्हणजेच त्रेतायुगापासून हिंदू लोक विजयादशमी महोत्सव साजरा करत आहेत. प्रभू श्रीराम याने रावणावर विजय मिळवून त्याचा वध केला, तोही याच दिवशी. या अभूतपूर्व विजयामुळे या दिवसाला 'विजयादशमी' असे नाव मिळाले आहे.

पांडवांनी अज्ञातवास संपताच शक्तीपूजन करून शमीच्या वृक्षावरची आपली शस्त्रे परत घेतली आणि विराटाच्या गायी पळवणाऱ्या कौरव सैन्यांवर स्वारी करून विजय मिळवला, तोही याच दिवशी. दसऱ्याच्या दिवशी इष्टमित्रांना आपट्याची पाने 'सोने' म्हणून वाटण्याची प्रथा आहे. या प्रथेलाही ऐतिहासिक महत्त्व आहे. मराठे वीर मोहिमेवर गेल्यानंतर शत्रूचा प्रदेश लुटून सोन्यानाण्यांच्या रूपाने संपत्ती घरी आणत असत. असे हे विजयी वीर किंवा शिलेदार मोहिमेवरून परत आले की, दारात त्यांची पत्नी किंवा बहीण त्यांना ओवाळीत असे. मग ते परमुलखातून लुटून आणलेल्या त्या संपत्तीतला एखादा नग त्या ओवाळणीच्या तबकात टाकीत असत. घरात गेल्यावर आणलेली लूट देवापुढे ठेवीत. नंतर देवाला आणि वाडवडिलांना नमस्कार करून आशीर्वाद घेत असत. या घटनेची स्मृती सध्याच्या काळात आपट्याची पाने सोने म्हणून वाटण्याच्या रूपाने शिल्लक उरली आहे.



हा सण एक कृषीविषयक लोकोत्सव म्हणूनही साजरा होत असे. पावसाळ्यात पेरलेले पहिले पीक घरात आल्यावर शेतकरी हा उत्सव साजरा करीत. नवरात्रात घटस्थापनेच्या दिवशी घटाखालच्या स्थंडिलावर नऊ धान्यांची पेरणी करतात आणि दसऱ्याच्या दिवशी त्या धान्यांचे वाढलेले अंकुर उपटून देवाला वाहतात. कित्येक ठिकाणी शेतातल्या भाताच्या लोंब्या तोडून आणून त्या प्रवेशद्वारावर तोरणासारख्या बांधतात. ही प्रथाही या सणाचे कृषीविषयक स्वरूपच व्यक्त करते. तसेच तो एक राजकीय स्वरूपाचा सणही ठरला.

**सण साजरा करण्याची पद्धत :** या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजन आणि शस्त्रपूजा ही चार कृत्ये करायची असतात.

**सीमोल्लंघन :** अपराण्हकाली (तिसऱ्या प्रहरी, दुपारी) गावाच्या सीमेबाहेर ईशान्य दिशेकडे सीमोल्लंघनासाठी जातात. जिथे शमीचा किंवा आपट्याचा वृक्ष असेल, तिथे थांबतात.

**शमीपूजन :** पुढील श्लोकांनी शमीची प्रार्थना करतात. 'शमी शमयते पापं शमी लोहितकण्टका । धारिण्यर्जुनबाणानां रामस्य प्रियवादिनी।।'

करिष्यमाणयात्रायां यथाकाल सुखं मया । तत्र निर्विघ्नकर्त्री त्वं भव श्रीरामपूजिते ।।

**अर्थ :** शमी पाप शमवते (नष्ट करते). शमीचे काटे तांबूस असतात. शमी रामाला प्रिय असून अर्जुनाच्या बाणांना धारण करणारी आहे. हे शमी, रामाने तुझी पूजा केली आहे. मी यथाकाल विजययात्रेला निघणार आहे. ही यात्रा तू मला निर्विघ्न आणि सुखकारक कर.

**आपट्याचे पूजन :** आपट्याची पूजा करताना असल्यास पुढील मंत्र म्हणतात - 'अश्मन्तक महावृक्ष महादोषनिवारण । इष्टानां दर्शनं देहि कुरु शत्रुविनाशनम् ।।'

**अर्थ :** हे अश्मंतक महावृक्षा, तू महादोषांचे निवारण करणारा आहेस. तू मला माझ्या मित्रांचे दर्शन घडव आणि माझ्या शत्रूंचा नाश कर. नंतर त्या वृक्षाच्या मुळाशी तांदूळ, सुपारी आणि सुवर्णनाणे (विकल्पाने तांब्याचे नाणे) ठेवतात. मग वृक्षाला प्रदक्षिणा घालून त्याच्या बुंध्याजवळची थोडी माती आणि त्या वृक्षाची पाने घरी आणतात.

**आपट्याची पाने सोने म्हणून देणे :** शमीची नाही; पण आपट्याची पाने सोने म्हणून देवाला वाहतात आणि इष्टमित्रांना देतात. सोने हे लहानांनी मोठ्यांना द्यायचे असते, असा संकेत आहे. आपट्याची पाने तेजतत्त्वाच्या लहरींनी युक्त असतात. आपट्याची पाने स्वीकारणाऱ्याला दसऱ्याच्या दिवशी जास्त प्रमाणात कार्यरत असलेले श्रीरामतत्त्व आणि मारुतितत्त्व यांचा सहज लाभ होतो. दसऱ्याला श्रीराम आणि हनुमान यांचे स्मरण केल्याने जिवात दास्यभक्ती निर्माण होऊन श्रीरामाचे तारक, म्हणजेच आशीर्वादरूपी तत्त्व मिळण्यास साहाय्य होते.

**अपराजितापूजन :** ज्या ठिकाणी शमीची पूजा होते, त्याच ठिकाणी भूमीवर अष्टदल काढून त्यावर अपराजितेची मूर्ती ठेवतात आणि तिची पूजा करून पुढील मंत्राने प्रार्थना करतात. **'हारेण तु विचित्रेण भास्वत्कनकमेखला । अपराजिता भद्ररता करोतु विजयं मम् ।।**

**अर्थ :** गळ्यामध्ये चित्रविचित्र हार घालणारी, जिच्या कटीत चकाकणारी सुवर्णमेखला आहे, अशी आणि (भक्तांचे) कल्याण करण्याच्या कामी तत्पर अशी अपराजितादेवी मला विजय देवो. काही ठिकाणी अपराजितेची पूजा सीमोल्लंघनाला निघण्याच्या पूर्वीही करतात.

**शस्त्रे आणि उपकरणे यांचे पूजन :** या दिवशी राजे, सामंत आणि सरदार हे वीर आपापली उपकरणे आणि शस्त्रांचे पूजन करतात. त्याचप्रमाणे शेतकरी आणि कारागीर हे आपापली आऊते आणि हत्यारे यांची पूजा करतात. (काही लोक ही शस्त्रपूजा नवमीच्या दिवशीही करतात.) लेखणी आणि पुस्तके ही विद्यार्थ्यांची शस्त्रेच होत; म्हणून विद्यार्थी त्यांचे पूजन करतात. या पूजनामागील उद्देश हा की, त्या त्या गोष्टींमध्ये ईश्वराचे रूप पाहणे, अर्थात ईश्वराशी एकरूपता साधण्याचा प्रयत्न करणे.

**सरस्वती पूजन :** या दिवशी सरस्वती पूजनही करतात. दसऱ्याला कार्यरत असलेल्या श्री सरस्वतीच्या मारक तत्त्वाच्या लहरींचा लाभ होऊन पूजकातील क्षात्रतेज जागृत होते.

**राजविधान :** दसरा हा विजयाचा सण असल्यामुळे या दिवशी राजेलोकांना विशेष विधान सांगितले आहे.

**लौकिक प्रथा :** काही घराण्यांतील नवरात्रींचे विसर्जन नवमीच्या दिवशी, तर काहींचे दशमीच्या दिवशी करतात.

**संकलन : श्री. हिरालाल तिवारी.**

संदर्भ : 'सनातन संस्थेचा ग्रंथ सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'


टुडेज् ब्लॉग

# करूया विकृतीचे सीमोल्लंघन..!

**महाराष्ट्राची कुलस्वामिनी अर्थात तुळजाभवानी मातेचा नवरात्रौत्सव संपूर्ण महाराष्ट्रात अत्यंत आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. त्यातील आता शेवटचा टप्पा म्हणजे विजयादशमी अर्थात दसरा..!**

दसऱ्याच्या दिवशी रावणाचे दहन केले जाते त्यालाच आपण 'रावणदहन' असे म्हणतो. या विजयादशमी दसऱ्याच्या दिवशी प्रत्येक स्त्री-पुरुषाने रावणदहन करण्याऐवजी स्वतःतील विकृतीचे व वाईट विचारांचे दहन केले तरच ती खरी विजयादशमी ठरेल असे मला वाटते. नवरात्रौत्सवात सर्व देवीभक्त नऊ दिवस पायात पादत्राणे न घालण्याचा संकल्प करतात आणि संकल्प केल्यानुसार पालनही केले जाते. या संकल्पनेतून त्यांचे तुळजाभवानी मातेवर असलेली खरी श्रद्धा आणि भक्ती दिसून येते परंतु या नवरात्र उत्सवामध्ये पादत्राणे त्याग करण्याऐवजी प्रत्येक स्त्री पुरुषाने त्यांच्यात असलेल्या वाईट व्यसनांचा त्याग केला किंवा वाईट व्यसन सोडण्याचा संकल्प केला तरच ती खरी नवरात्री ठरेल. पुरुषप्रधान संस्कृती असलेल्या आपल्या भारत देशामध्ये अनादी काळापासूनच स्त्रियांसंदर्भात अत्यंत नकारात्मक भावना किंवा पद्धती अस्तित्वात होत्या आणि आजही आहेत. अशिक्षित आणि सुशिक्षित दोघेही आजही त्या स्त्रियांसंदर्भात असलेल्या विकृत परंपरेला पाठिंबा देत असल्याचे अनेक वार्तांवरून दिसून येते. जर शिक्षण घेऊनदेखील आपण आपल्या समाजात अस्तित्वात असलेल्या वाईट परंपरांचा आधार घेऊन आजही स्त्रियांचा छळ करत असेल तर आपल्या

शिक्षितपणाला किंवा शिक्षणाला काहीही अर्थ नाही असे मला वाटते असे. सतीप्रथा, कौटुंबिक हिंसाचार, हुंडापद्धत, अशा अनेक स्त्रियांसंदर्भात वाईट परंपरा आपल्या समाजात अस्तित्वात होत्या आणि आजही आहेत आणि या सर्वांना छेद देऊन किंवा मूठमाती देऊन आपल्याला एक सुसंस्कृत समाज घडवणे गरजेचे आहे. आपल्याला स्त्री सन्मान या विषयावरती व्याख्याने आयोजित करणे गरजेचे आहे.. शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये देखील स्त्रीआदर हा विषय अंतर्भूत करणे गरजेचे आहे जेणेकरून लहानपणापासूनच मुला मुलींमध्ये स्त्री आदर काय असतो या संदर्भात त्यांचे ज्ञान वृद्धिंगत होईल आणि समाजामध्ये घडणाऱ्या अनेक विकृत प्रकारांना आळा बसेल असे मला वाटते. नवरात्रीमध्ये केवळ नऊ दिवस स्त्रियांचा आदर सन्मान करणे म्हणजे स्त्री सन्मान नव्हे तर दिवस रात्र प्रत्येक क्षणी प्रत्येक स्त्रीला कुठेही सुरक्षित वाटणे म्हणजे खरे नवरात्र आहे असे मला वाटते. आधुनिकते संदर्भात किंवा स्त्रियांच्या बदललेल्या जीवनशैली संदर्भात आजही स्त्रियांना अनेक सल्ले दिले जातात परंतु महिलांकडे पाहण्याची नकारात्मक दृष्टी मात्र बदलली जात नाही ही वास्तविकता आहे.



वर्तमानपत्रातील अनेक वार्तांवरून समाजातील विकृत पद्धती, विकृत विचार वाढल्याचे दिसून येतात. परंतु त्या वाईट प्रवृत्तींना शिक्षा देण्यासंदर्भात जर आपला कायदा कुचकामी ठरत असेल किंवा कायद्यातील अनेक पळवाटा शोधून या नकारात्मक प्रवृत्ती समाजात पुन्हा ताठ मानेने वावरत असतील तर पिडीत स्त्रियांच्या अस्तित्वासाठी तो अत्यंत धोकादायक आहे. अनेक पीडित स्त्रियांना न्याय मिळणार कसा हा महत्त्वाचा मुद्दा अपूर्ण राहतो. भारतीय संविधानाच्या मूलतत्त्वांमध्ये स्त्री पुरुष समानता हा गाभाघटक अंतर्भूत आहे आणि तो केवळ कायद्यापुरताच मर्यादित आहे असे मला वाटते. कारण प्रत्यक्ष समाजामध्ये स्त्री पुरुष समानता ही कुठेही किंवा कोणत्याही क्षेत्रात दिसून येत नाही ही शोकांतिका आहे. पदाच्या बाबतीत असेल किंवा वेतनाच्या बाबतीत असेल किंवा सन्मानाच्या बाबतीत, कुटुंबातील स्त्रीच्या अस्तित्वाच्या बाबतीत असेल आजही स्त्रियांना तुच्छतेची वागणूक दिली जाते ही वास्तविकता आपण नाकारू शकत नाही. गरिबी आणि बेरोजगारी यामुळे अनेक खेडेगावातील मुलींना तरुणींना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. गरिबीचे कारण देत त्यांची अल्पवयातच विवाह लावून देण्यात येतात ज्यामुळे मातामृत्यूचे प्रमाण वाढलेले दिसून येते. मातामृत्यूची वास्तविकता अत्यंत भयानक आहे. स्त्रियांच्या बदललेल्या जीवनशैलीसंदर्भात इतक्या गलिच्छ पद्धतीने वक्तव्ये केली जातात की प्रत्येक स्त्रीला प्रश्न पडतो की नेमकं स्त्रियांनी कसे जगावे? समाजात स्त्रियांसंदर्भात आजही अस्तित्वात असलेल्या अनेक वाईट विचारांचा, भावनांचा आणि विकृतींचा सीमोल्लंघन करण्याचा जर आपण संकल्प केला तरच खऱ्या अर्थाने विजयादशमी दसरा साजरा केल्याचे सार्थक होईल आणि 'रावणदहन' करण्यापेक्षा स्वतःतील वाईट विचारांचे, विकृतीचे दहन केले तरच ती खरी विजयादशमी ठरेल असे मला वाटते. विजयादशमीच्या दिवशी आपट्याची पाने एकमेकांना देऊन एकमेकांत असलेला जो जिव्हाळा वृद्धिंगत केला जातो तो जिव्हाळा तुमच्यात कायम राहो हीच सर्वांना विजयादशमीच्या शुभेच्छा..!

**- चिदानंद चाबुकस्वार, सोलापूर.**

जन्म हा अखेरचा

## सेव्यस्थल



परंतु त्याच्या ठिकाणी जीवभाव आला की, तो जीवात्मा होऊन शरीरापुरता संकुचित दिसू लागतो. वस्तुत: एकच आत्मा असंख्य शरीरातून प्रतिबिंबित होत असतो. ज्यांच्या हृदयाला या व्यापकतेचा स्पर्श झालेला असतो, असे संत विश्वकल्याणाची कामना बाळगत असतात. दुसऱ्यांना सुखी पाहून तो आनंदी होतात आणि त्यांची दु:खे पाहून व्यथित होतात. म्हणून संतांनी 'सर्वे सुखिन: भवन्तु ।' अशी प्रार्थना केली आहे. त्यांच्याजवळ कोरडी शाब्दिक सहानुभूती नसते तर समानुभूती असते, ते सर्वांना आत्मवत् जाणतात, पाहतात...

आणवमलामुळे जीवात अणुभाव येतो आणि तो स्वत:ला देहापुरता संकुचित समजू लागतो. त्याचप्रमाणे त्याच्या ठायी मायामोह उत्पन्न होतो. यालाच 'मायीव मल' म्हणतात. 'हे माझे' असे ममत्व म्हणजेच मायीय मल. थोडक्यात, शरीर म्हणजे मी असा देहात्मभाव म्हणजे आणवमल. 'हे माझे ते तुझे' असा आपपरभाव म्हणजे मायामल आणि आणव व मायीय मलांमुळे त्याच्याकडून घडणारी कर्मे म्हणजे कार्मिकमल होय. मग आपल्या कर्मांनीच तो बद्ध होतो, बांधला जातो. किटक जसा आपल्या शरीरातून स्त्रवणाऱ्या द्रवाने स्वत:भोवती कोष बांधून घेतो त्याप्रमाणे, मागील जन्मांत केलेल्या कर्माप्रमाणे आपला या जन्मातला व्यवहार चाललेला असतो. आत्म्यात अणुभाव कधी आला? त्याने कर्मात स्वत:ला कधी बांधून घेतले? या प्रश्नांची उत्तरे कोणालाही देता येत नाहीत. आपल्या कर्मांच्या आधीन असलेला जीवात्मा या प्रपंचात सुख-दु:खे भोगत जन्मजन्मांतरात भ्रमत असतो एवढे मात्र खरे. तो अंत:करणाचा आश्रय घेतो तेव्हा तो अहंकारी बनतो. पाणी शुद्ध असते; परंतु रंगाच्या संबंधाने ते रंगीत होते त्याप्रमाणे. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# समलिंगी विवाहास देशात मान्यता नकोच!

देशात समलिंगी विवाहाला मान्यता आणि समलिंगी जोडप्यांना दत्तक मूल घेण्याची परवानगी यावर न्याय दिला. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अर्जदारांनी केलेली याचिका निकालात काढताना समलिंगी विवाहांसंबंधी कायदा करण्याचे अधिकार विधिमंडळांना आहेत त्यात बदल करण्याचे अधिकार कायदेमंडळ आणि संसदेकडे आहेत, असे स्पष्ट करून दोन्ही याचिका न्यायालयाने निकालात काढल्या. जीवनसाथी निवडण्यात भेदभाव असू नये. त्यांची निवड करण्याचे अधिकार एलजीबीटीसह सर्वांना आहेत, त्यासंबंधी कायदेशीर समलिंगी विवाहाला मान्यता देण्याविषयी विचार व्हावा, अशी खंडपीठातील न्यायाधीशांची मते आहेत. समलिंगी विवाह जगातील ६४ देशांनी स्वीकारलेला नाही. नेदरलँड व तैवान हे समलिंगी विवाहाला मान्यता देणारे पहिले युरोपियन आणि आशियन देश आहेत. ३४ देशांत समलिंगी विवाहाला मान्यता देण्यात आली असून २२ देशांत तत्संबंधी कायदे बनविले गेले आणि ते मंजूर केले गेलेत.

काही देशांत समलिंगी विवाहांना कायदेशीर परवानगी दिली गेली असली तरीही त्या देशांच्या संसदेत त्यासंबंधी कायदा झालेला नाही. काही देशांत अशा विवाहाला मान्यता तर काही देशांत शिक्षा केली जाते. अशा परिस्थितीत लक्षात येते ते म्हणजे जगभरात लोकांच्या बदलत्या आवडी निवडी, मानसिकता यामुळे तेथील सरकारांनी लोकांच्या मतांना मान्यता दिली असावी. पारंपरिक लैंगिक भिन्नता विचारात घेऊन लग्नाच्या बेडीत अडकून राहणारी पिढी आणि वर्तमानात वेगळाच विचार करून आपले अधिकार बजावू पाहणारी नवी पिढी यांची विचारसरणी व मानसिकता यात जमीन अस्मानाचा फरक पडला आहे. परंपरांना छेद देऊ पाहणाऱ्या वर्तमानातील तरुण-तरुणींना कोठल्याही बंधनात अडकून आपल्यापायी निर्माण होणाऱ्या समस्यांची जबाबदारी घ्यायची नाही. अशी ही नवी पिढी आपल्यापुढे उद्भवणाऱ्या प्रसंगांना सामोरे जाण्यास तयार आहे, असे वाटते. जोडीला थोड्याफार शिक्षणाचे पाठबळ आहे. कष्ट करण्याचीही तयारी आहे या सर्वांचा विचार करता पारंपारिक विवाह किंवा समलिंगी विवाह करून ही मंडळी भविष्यात काय करणार आहेत, याचा विचार वर्तमानातील लोकांनी करण्याची गरज भासणार नाही असे वाटते.

**- स्नेहा राज, गोरेगाव.**

# ७८ वर्षांची अखंड वाटचाल

जगात पहिले व दुसरे अशी दोन महायुद्धे मानव जातीला नाशकारक ठरली. या दोन्ही युद्धात लाखो मानवाची हानी झाली. कित्येक बेघर झाले. राष्ट्रीय संपत्तीची अफाट हानी झाली. जर्मनीचा हुकूम शहा एडॉल्फ हिटलर यांच्या महत्वाकांक्षीने त्याने साऱ्या जगाला युद्धात ओढले, युद्धात जरी दोस्त राष्ट्रांचा विजय झाला तरीही त्यांची ही हानी अफाट झाली होती हे विसरता येणार नाही. दुसऱ्या महायुद्धाचा शेवट जपानमधील हिरोशिमा व नागासाकी या शहरावर अमेरिकेने बॉम्ब हल्ले करून झाला.

या बैठकीत जागतिक स्वरूपात शांतता व सहकार्य करण्यासाठी एक संघटना असावी असे ठरविण्यात आले हीच ती संयुक्त राष्ट्र संघटना. स्थापनेच्या वेळी ५० वेळच्या सदस्य संख्येने असलेल्या संयुक्त राष्ट्राची संख्या आज १९३ सदस्य संख्या एवढा पल्ला गाठला आहे. जगात शांतता राखणे आतंरराष्ट्रीय सुरक्षितता राखणे, सामाजिक प्रगती करणे, आर्थिक प्रगती करणे, व जगात सहकार्य करणे ही मुख्य कामे संयुक्त राष्ट्र संघ करतो. याचे कार्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या अरेबिक, इंग्लिश, चिनी फ्रेंच, रशियन व स्पॅनिश अशा सहा भाषा अधिकृत आहेत. हिंदी ही भाषा सुद्धा अधिकृत व्हावी या दृष्टीने भारताने अनेक प्रयत्न केले आहेत, हिंदी ही जगात सर्वाधिक बोलली जाणारी तिसरी भाषा आहे.

१९७७ साली भारताचे माजी पंतप्रधान कै. अटल बिहारी बाजपेयी यांनी युनोत हिंदी भाषेत भाषण करून एका इतिहास निर्माण केला होता. त्यानंतरही २०१४ साली पंतप्रधान मोदी यांनी हिंदीत भाषण केले होते. २०१५ साली त्यावेळच्या परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज्य यांनी २०१५ साली व विदेशमंत्री यांनी २०१६ साली युनोत हिंदी भाषेत भाषणे केली होती. भारत हिंदी ही राष्ट्रसंघाची अधिकृत भाषा व्हावी याद्दष्टीने सतत प्रयत्न शील आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या विविध शाखा कार्य करतात. उदा आमसभा, सुरक्षा परिषद, आर्थिक व सामाजिक परिषद, सचिवालय, आंतरराष्ट्रीय न्यायालय इत्यादी. संयुक्त राष्ट्रसंघाची कायमची सुरक्षा परिषद आहे त्या परिषदेची सहा राष्ट्रे कायमची सदस्य आहेत. त्यामध्ये अमेरिका, रशिया, चीन, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी ही होत. सुरक्षा परिषदेचे कायमचे सदस्यपद मिळावे या दृष्टीने अनेक प्रयत्न झाले पण चीनच्या विरोधामुळे हे सदस्यत्व मिळविण्यात भारताला अजूनपर्यंत शक्य झालेले नाही. भारताला या अस्थायी सुरक्षा समितीचे सभासदत्व अनेक वेळा मिळाले होते. १ जानेवारी २०२१ पासून भारत अस्थायी सुरक्षा समितीचा सभासद दोन वर्षासाठी होता. संयुक्त राष्ट्र संघाची स्वतःची अशी सुरक्षा यंत्रणा नाही. जगात सदस्य राष्ट्रांना आदेशाप्रमाणे शांती सेना पाठवावी लागते. भारताने अनेक वेळा राष्ट्रसंघाच्या आदेशावरून शांती सेना पाठवून सहकार्य केले होते. गेल्या ७५ वर्षांचे सिंहावलोकन केल्यास संयुक्त राष्ट्र संघ बऱ्याच प्रमाणात शांतता राखण्यात यशस्वी झाला आहे. याचा अर्थ जगात युद्धे संपली आहेत, असे नाही. ती कमी करण्यात थोडे बहुत यश आले आहे. यापुढील युद्धे ही पारंपरिक शस्त्रावर लढली जाणार नसून ती संहारक अणू शस्त्रावर लढली जातील. त्यामुळे युद्धे झाल्यास मानवजातीला यापुढील काळात मोठा धोका होऊ शकतो. गेली कित्येक दिवस रशिया व युक्रेन पंचायतीला युद्ध चालू आहे. ते थांबविण्यात संयुक्त राष्ट्रसंघाला यश आलेले नाही.



आता इस्त्रायल युद्ध चालू झाले आहे. राष्ट्रसंघाचे महत्त्व मोठे आहे. जागतिक शांतता राखण्यात तो मोठी भूमिका बजावू शकतो. याशिवाय संयुक्त राष्ट्रसंघाच्या ज्या विविध शाखा आहेत, त्यांनी समन्वयाचे काम उत्तम रीतीने केले आहे. जगात सामाजिक व आर्थिक प्रगती व्हावी याद्दष्टीने अनेक प्रयत्न करण्यात आले आहेत. आरोग्य शिक्षण, आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न यामध्ये राष्ट्रसंघाने भरीव कामगिरी केलेली आहे पण अजूनही युद्धे होतच आहेत. ती जर युनोला थांबविता आली व विकासाचे व सहकार्याचे वातावरण निर्माण करण्यात यश आले तर युनोने जागतिक स्तरावर खऱ्या अर्थाने स्थान मिळविले असे म्हणता येईल.

**- शांताराम वाघ, पुणे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# सीमोल्लंघनासाठी प्रशासन सज्ज

# पोलीस आयुक्त, महापालिका अतिरिक्त आयुक्तांनी केली शमी वृक्ष परिसराची पहाणी

✔ सुराज्य/सोलापूर

**विजयादशमी, दसऱ्यानिमित्ताने पार्क स्टेडीयम लगतच्या शमी वृक्ष परिसराची पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी महापालिका आणि विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत तयारीची पाहणी करून आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्या. तत्पूर्वी महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनीदेखील पाहणी केली होती.**

मंगळवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येणाऱ्या विजयादशमी, दसऱ्यानिमित्ताने पार्क स्टेडियम लगत असलेल्या शमी वृक्षास प्रदक्षिणा घालून नवरात्रौत्सव मंडळ व भक्तगण भक्तमय वातावरणात सीमोल्लंघन साजरे करतात. यानिमित्ताने मोठ्या प्रमाणात भक्तांची येथे गर्दी होत असते. यानिमित्ताने सोमवारी दुपारी पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांच्यासमवेत महापालिका अधिकाऱ्यांनी पार्क स्टेडियम लगत असलेल्या शमी वृक्ष परिसरात केलेल्या आवश्यक सोयी सुविधा, इतर कामांची पाहणी केली.

यावेळी पोलीस उपायुक्त विजय कबाडे, उपायुक्त दीपाली काळे, सहायक आयुक्त, पोलीस निरीक्षक विश्वनाथ सिद, महापालिका झोन अधिकारी नंदकुमार जगधनी, भूमी व मालमत्ता विभागाचे माढेकर, दीनकर इंगळे, कनिष्ठ अभियंता किशोर फत्तेवाले उपस्थित होते.

दरम्यान, शमी वृक्ष परिसरात येणाऱ्या नंदिकोल व पालखी मिरवणुकीस अडथळा येणार नाही, या संदर्भात आवश्यक त्या सूचना दिल्या. अडथळा ठरणाऱ्या गाड्या काढण्यात आल्या. लाईटची व्यवस्था, सूचना फलक, प्रवेशद्वार, सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था या दृष्टिकोनातून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

सोमवारी सकाळी ११ वाजता महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांसमवेत पार्क स्टेडियमलगतच्या शमी वृक्ष परिसराची पहाणी केली. आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, झोन अधिकारी नंदकुमार जगधनी, महामंडळाचे पदाधिकारी दास शेळके, दत्तात्रय मेनकुदळे, विजय पुकाळे उपस्थित होते.



### चार हुतात्मा पुतळ्याच्या बाजूच्या मुख्य द्वारातून प्रवेश

सीमोल्लंघन दिवशी देवी भक्तांना धार्मिक विधी व्यवस्थित पार पाडण्यासाठी मदत व्हावी. कोणत्याही अडथळ्याशिवाय देवी भक्तांना सीमोल्लंघन विधी करता यावा, यासाठी नियोजन करण्यात आले आहे. चार हुतात्मा पुतळ्याच्या बाजूच्या मुख्य द्वारातून भक्तगण प्रवेश करतील. पार्क स्टेडियममधील सावजी हॉटेललगतच्या द्वारातून बाहेर पडण्याची व्यवस्था केली आहे. प्रशासनाकडून नेटके नियोजन करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक विश्वनाथ सिद यांनी दिली.

### महापालिका प्रशासनाकडून जय्यत तयारी

महापालिका प्रशासनाने महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या मार्गदर्शनाखाली जय्यत तयारी केली आहे. महापालिका झोन (क्रमांक -१) अधिकारी नंदकुमार जगधनी यांच्या समन्वयातून उद्यान, विद्युत, आरोग्य अभियंता व इतर विभागाच्या माध्यमातून नेटकी व्यवस्था केली आहे. पार्क स्टेडियम येथील शमी वृक्ष परिसरात नेटकी स्वच्छता, साफसफाई केली आहे. हा परिसर पाण्याने धुऊन चकाचक केला आहे. लाईट व्यवस्था केली आहे. अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या, गाड्या काढण्यात आल्या असून, परिसर मोकळा केला आहे. आवश्यकतेनुसार सूचना फलक लावण्यात येत आहेत.

## विवाहितेचा छळ करून मारहाण; पतीसह तिघांवर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देत आर्थिक छळ करत त्यांची मुलगी व त्यांना अमानुष मारहाण केली.त्यानंतर वडिलांकडून १५ लाख रुपये घेऊन ये, पुणे येथे प्लॅट घेऊन दे, असे म्हणून छळ करून जींवे मारतो म्हणत खोट्या गुन्ह्यांमध्ये गुंतवण्याची धमकी दिल्याप्रकरणी पतीसह तीन जणांविरुद्ध विजयपूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पती संदेश जाधव, सासू शारदा कुंडलिक जाधव, पतीचे मामा शरद भोसले (पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी अर्चना संदेश जाधव (वय-३२, रा.नम्रता हौसिंग सोसायटी, विजयपूर रोड) यांनी विजयपूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. ही घटना जानेवारी २०२० ते ३ जुलै २०२३ दरम्यान फिर्यादीच्या सासरी पुणे येथे घडली. तपास पोलीस हवालदार भिसे हे करीत आहेत.

## घर जागेच्या कारणावरून कटरने मारहाण

✔ **सोलापूर** : घर जागेच्या कारणावरून कटरने मारहाण केल्याची घटना बलिदान चौक येथे घडली. फिर्यादी गौरीशंकर




अण्णाराव तोळनूर (वय-२५, विक्रांतनगर, मल्लिकार्जुननगर, अक्कलकोट रोड) यांच्या राहत्या घरी त्यांचे काका मल्लिनाथ सिद्रामप्पा तोळनूर (बलिदान चौक) यांनी घर जागेच्या कारणावरून फिर्यादी गौरीशंकर यांना शिवीगाळ करून बारक्या कटरने त्यांच्या डाव्या हाताच्या पोटरीवर मारून जखमी केले. याप्रकरणी गौरीशंकर तोळनूर यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून मल्लिनाथ तोळनूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस हवालदार दुधाळे ही करीत आहेत.

## सरवदे नगरात घर फोडून दागिने पळवले

✔ **सोलापूर** : भावाच्या घरी कार्यक्रम असल्याने घराच्या मुख्य दरवाजाला कुलूप लाऊन कार्यक्रमाला गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने कुलूप तोडून घरातील दागिने पळवले. चोरट्याने कपाटातील लॉकर तोडून सोन्याचे पेंडल व सोन्याचे नेकलेस असा एकूण ८५ हजारांचे दागिने चोरून नेले आहे. ही घटना दि.२१ ते २२ ऑक्टोबरदरम्यान सरवदेनगर, जुना विडी घरकूल येथे घडली. याप्रकरणी वाहिद महबूब तांबोळी (वय-२५) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस हवालदार भांगे हे करीत आहेत.

## प्रॉपर्टीच्या कारणावरून मारहाण; दोघा सख्ख्या भावांवर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : प्रॉपर्टीच्या कारणावरून शिवीगाळ करत बघून घेण्याची धमकी देत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी दोघा सख्ख्या भावांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. सागर शंकर जकनाईक, संदीप शंकर जकनाईक असे गुन्हा दाखल झालेल्या दोघा भावांची नावे आहेत. याप्रकरणी सुभाष जकनाईक (वय-६३, पश्चिम मंगळवार पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी हे वाकिंग करून घरी जात असताना सागर, संदीप या त्यांच्या भावाच्या मुलांनी फिर्यादी सुभाष यांना थांबवून प्रॉपर्टीच्या कारणावरून तुला बघून घेतो, असे म्हणत शिवीगाळ करून दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. फिर्यादीच्या समोरील वरचे दोन दात पाडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बनसवडे हे करीत आहेत.

## पूर्व भाग नवरात्र महोत्सव महामंडळाच्या 'विश्वकर्मा'योजनेच्या शिबिराला प्रतिसाद

✔ **सोलापूर** : पूर्व भाग नवरात्र महोत्सव महामंडळ व सोलापूर विकास कृती मंचाद्वारे सोलापूर शहरात विविध भागात 'शासन आपल्या दारी' व 'पंतप्रधान विश्वकर्मा कर्ज योजना' मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. शासन आपल्या दारीअंतर्गत नवीन रेशन कार्ड, दुबार रेशन कार्ड नोंदणी, नूतन आधार कार्ड, मतदान नोंदणी, संजय गांधी निराधर योजना, आरोग्य, पॅन, आरोग्य कार्ड व राष्ट्रीयकृत बँकेची नवीन खाते आदींसाठी हे शिबीर घेण्यात आले.यावेळी अग्रणी बँकेचे मॅनेजर प्रशांत नाशीककर व समीर माढेकर यांनी पंतप्रधान विश्वकर्मा योजनेविषयी मार्गदर्शन केले. ब्रह्मदेवदादा माने बँकेचे नूतन संचालक सचिन चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक विष्णू कारमपुरी, सूत्रसंचालन विठ्ठल कुऱ्हाडकर, आभार प्रदर्शन प्रसाद जगताप यांनी केले. यावेळी अध्यक्ष बंदपट्टे, श्रीनिवास बोगा, गुरुनाथ कोळी, शहानवाज कंपली, विठ्ठल कुऱ्हाडकर, सादीक शेख, सोहेल शेख, रेखा आडकी, श्रेया जगताप, गौरी जगताप, किरण साळुंके, दीपक कोंडा, अरविंद भीमनाथ, प्रशांत कोमटी, नंदाल, नागनाथ कारमपुरी, विष्णू सामल, अक्षय उपस्थित होते.

## कार्तिकी यात्रा : स्काय वॉक, दर्शन रांगेत आपत्कालीन मार्गाची व्यवस्था करण्यात येणार

✔ सुराज्य/पंढरपूर

कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे ८ ते १० लाख भाविक येतात. या यात्रा कालावधीत दर्शन रांग गोपाळपूरपर्यंत गेलेली असते. दर्शन रांगेत आसणाऱ्या भाविकांना वैद्यकिय तसेच आवश्यक सुविधा तत्काळ उपलब्ध व्हाव्यात, यासाठी स्काय वॉक व दर्शन रांगेत आपत्कालीन मार्गाची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती प्रांताधिकारी गजानन गुरव, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी पाहणी वेळी दिली.

कार्तिकी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधाबाबतची पाहणी प्रांताधिकारी गजानन गुरव, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी केली.

### मुखदर्शन रांगेच्या नियोजनाबाबत सखोल पाहणी



कार्तिक शुद्ध एकादशीच्या शासकिय महापुजेच्यावेळी मुख दर्शन रांग सुरु ठेवण्यात येणार आहे. या मुखदर्शन रांगेच्या नियोजनाबातची पाहणी, मंदीर, दर्शन मंडप, स्काय वॉक, दर्शन रांग, पत्रा शेड, वाळवंट, विष्णूपद बंधारा, गोपाळपूर, ६५ एकर या ठिकाणची पाहणी पाहणी करण्यात आली.

यावेळी मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता भिकाजी भोळे, मंदीर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न भातलवंडे, प्रभारी आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, पोलीस उपनिरिक्षिक घुगरकर उपस्थित होते.

चंद्रभागा वाळवंटात भजन, किर्तनासाठी उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये शुध्द नवमी ते शुध्द पोर्णिमेपर्यंत तंबू, मंडपासाठी परवानगी देण्यात आल्याने वाळवंट परीसर, घाटाची वेळोवेळी स्वच्छता करावी. नदी पात्रातील घाटावर आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करावे. ६५ एकर मध्ये स्वच्छता, पाणी, प्रकाश व्यवस्था तसेच दिंड्यांना प्लॉटचे वाटप करण्यासाठी नियोजन करावे, अशा विविध सूचना प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी यावेळी केल्या आहेत.

## खाद्य पदार्थांची तपासणी करा; मगच वाटपास परवानगी द्यावी

✔ सुराज्य/सोलापूर

कोजागिरी पौर्णिमेनिमित्ताने तुळजापूरला पायी जाणाऱ्या भक्तांना अन्न व औषध प्रशासनाची परवानगी न घेता मंडळांच्यावतीने खाद्यपदार्थ तथा अन्न वाटप केले जाते. यातून अनुचित प्रकार अथवा घातपात घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे या अन्न-खाद्यपदार्थांची तपासणी करून वाटप करावे, अन्यथा या वाटपावर बंदी घालावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

कोजागिरी पौर्णिमेला लाखो भक्त तुळजापूरला पायी चालत जाऊन देवींचे दर्शन घेतात. शहराच्या विजयपूर रोड ते तुळजापूरपर्यंत बॅनर आणि तात्पुरते मंडप उभे करून महाप्रसादाचा वाटप केला जातो. मात्र या महाप्रसादाची अथवा अन्न पदार्थाची कोणतीही तपासणी केली जात नाही, नाही या खाद्यापदार्थ, महाप्रसादाची अन्नऔषध प्रशासनाची परवानगी, तपासणी करून वाटप करण्याचे बंधन घालावे. अन्यथा परवानगी देऊ नये. वाटप केलेल्या खाद्यपदार्थ आणि अन्नातून भक्तांना विषबाधा होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे ब्रह्मानंद धडके, यशवंत फडतरे, गणेश बोड्डू, विजय कुंदन जाधव यांनी केली आहे.

## वाळू चोरी प्रकरणी पोलिसांना मारहाण; ट्रॅक्टर चालकांसह चौघांची निर्दोष मुक्तता

✔ **सोलापूर** : वाळूची चोरटी वाहतूक करताना कारवाईसाठी आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यास मारहाण करून शासकिय कामात अडथळा केल्याच्या आरोपातून ट्रॅक्टरचा चालक व्हनप्पा महादेव कारले, सत्यनारायण व्हनप्पा कारले (देवीकवठा), अनिल जगन्नाथ चव्हाण (फताटेवाडी), जगन्नाथ ज्ञानेश्वर कामाठी (आंदेवाडी) यांना निर्दोष मुक्त करण्याचा आदेश जिल्हा न्यायाधीश एस. एम.आझमी यांनी दिला आहे. दि. ५ मार्च २०१३ रोजी आहेरवाडी ते बंगलगी रस्त्यावरून ट्रॅक्टरमधून वाळूची चोरटी वाहतूक करताना ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली होती. आरोपीतर्फे ॲड. सुरेश पाटील-कुरुलकर, ॲड. लक्ष्मण राठोड तर सरकारतर्फे ॲड. आनंद कुर्डूकर यांनी काम पाहीले.

## नेहरू युवा केंद्राचे एमटीएस सुभाष चव्हाण निलंबित

✔ सुराज्य/सोलापूर

नेहरू युवक केंद्र कार्यालयात दारू पित असल्याचा धक्कादायक प्रकार एका समाजिक संघटनेच्या माध्यमातून उघड झाला होता. या बाबत प्रसार माध्यमामध्ये वृत्त प्रसारीत होताच या वृत्ताची दखल घेत नेहरू युवा केंद्राचे एमटीएस सुभाष चव्हाण निलंबीतआले आहे.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये प्रसारित झालेल्या त्या वृत्ता बाबत नेहरू युवा केंद्राचे एमटीएस सुभाष चव्हाण हे दोषी आढळले आहेत. नेहरू युवा केंद्रात दारूच्या बॉटल सापडणे व अन्य काही आरोप सुभाष चव्हाण यांच्यावर लावण्यात आले आहेत. प्रसारित झालेल्या वृत्तानुसार सुभाष चव्हाण हे प्राथमिक स्तरावर दोषी आढळले आहेत. चव्हाण यांच्या अशा वर्तुणुकीमुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नेहरू युवा केंद्र संघटनाची प्रतिमा मलीन झालेली आहे. सुभाष चव्हाण यांच्यावर कारवाई करत तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. चव्हाण यांचे निलंबन कालावधीत नेहरू युवा केंद्र सोलापूर हेच मुख्यालय राहणार आहे. अशी माहिती सोलापूर नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी अजित कुमार यांनी दिली.

संस्थापक

स.म.कै. शंकरराव ना. मोहिते-पाटील

**कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज, जि. सोलापूर**

**पेट्रोल पंप || उद्घाटन समारंभ ||**

मंगळवार दि.२४/१०/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता

सस्नेह निमंत्रण

शुभहस्ते : **मा. श्री. विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील**
माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

कार्यक्रमाचे अध्यक्ष : **मा. श्री. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील**
चेअरमन,स.म.शंकरराव मोहिते-पाटील स.सा.का.लि. शंकरनगर-अकलूज




**प्रमुख उपस्थिती**

**मा. श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील** — आमदार, विधान परिषद
**मा.श्री.राम सातपुते** — आमदार, विधानसभा माळशिरस
**मा. श्री. धैर्यशील मोहिते-पाटील** — चेअरमन, शिवामृत दुध संघ, विझोरी
**मा. श्री. मिलींद कुलकर्णी** — व्हा.चेअरमन, श्री. शंकर स.सा.का.लि. सदाशिवनगर
**मा. सौ. संजीवनी पाटील** — मा.जि.प.सदस्या, सोलापूर
**मा. श्री. डॉ. आप्पासाहेब देशमुख** — नगराध्यक्ष, नगरपंचायत माळशिरस
**मा. सौ. अनिता लांडगे** — नगराध्यक्ष, नगरपंचायत नातेपुते
**मा. सौ. पुनम वळकुंदे** — उपनगराध्यक्ष, नगरपंचायत माळशिरस
**मा. श्री. मालोजीराजे देशमुख** — उपनगराध्यक्ष,नगरपंचायत नातेपुते
**मा. श्री. अमित कलनगुटकर** — चिफ रिजनल मॅनेजर, HPCL सोलापूर
**मा. श्री. अभिजीत कांबळे** — मॅनेजर इंजिनियरींग HPCL सोलापूर
**मा. श्री. अक्षय टेंभूर्णेकर** — एरीया सेल्स मॅनेजर, HPCL सोलापूर


वरील मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होणार आहे.
या प्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
....................✻ आपले ✻....................

**राजेंद्र काकडे** सचिव — **मामासाहेब पांढरे** उपसभापती — **मदनसिंह मोहिते-पाटील** सभापती
**सर्व संचालक मंडळ**

**स्थळ** - दुय्यम बाजार पेठ, माळशिरस (माळशिरस अकलूज रोड) माळशिरस. ता. माळशिरस, जि. सोलापूर



## संक्षिप्त वृत्त...



### नाडी परीक्षणाद्वारे १२५ जणांचे निदान

**सोलापूर :** बनशंकरी नवरात्र महोत्सव मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शेळगी परिसरातील १२५ जणांचा नाडी परीक्षणाद्वारे औषधोपचार आणि निदान करण्यात आले. शिबिराचे उद्‌घाटन संस्थापक अध्यक्ष राजशेखर रोडगीकर, आधारस्तंभ सुरेश हत्ती, अध्यक्ष दीपक भैरप्पा, उपाध्यक्ष ओंकार देशेट्टी, नाडीतज्ज्ञ सुनील बाणेगावकर उपस्थित होते. याप्रसंगी दत्तात्रय जाधव, बंडप्पा इंडे, अंबादास बिराजदार, सुरेश चारी, सुरेश जाधव, राजेश सवळी, शिवरतन पारीख, सोमनाथ होसाळे, डॉ.सिध्देश्वर दुलंगे, इरण्णा नाशिकर, ललित धूत, गुरुनाथ हिप्परगे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश जाधव, विजय चारी, योगेश मानशेट्टी, महेश होटकर आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.




### डॉ.भांजे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान विसरणे अशक्य

**शोकसभेत मान्यवरांनी व्यक्त केल्या भावना**

**सोलापूर :** डॉ. बी.एम. भांजे सरांनी शैक्षणिक व अध्यापन क्षेत्रात केलेले कार्य न विसरणारे आहे. ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी त्यांच्यामुळे घडलेले आहेत. त्यामुळे त्यांचे महाविद्यालय व विद्यापीठ विकासातील योगदान विसरणे अशक्य आहे. असे भावोद्‌गार जुळे सोलापुरातील गोविंदश्री मंगल कार्यालय येथे झालेल्या शोकसभेत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भावना व्यक्त केल्या. मंद्रुप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम. भांजे यांचे अकाली निधन झाले. त्यानिमित्त सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ, प्राचार्य संघटना, भुगोल अभ्यास मंडळ, अपूर्वा अभिमीत ज्ञानपीठ सोलापूर, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर व प्राचार्य डॉ. भांजे मित्रपरिवार यांच्या वतीने शोकसभा आयोजित केली होती. यावेळी डॉ. इरेश स्वामी, जयप्रकाश बिले,के.एम. जमादार, बाळासाहेब शेळके,एन.बी.पवार,व्ही.के.पाटील,नागेश बिराजदार,एस. सी. आडवितोट, उत्तमकुमार चौगुले,एन.बी.तेली,डॉ. महादेव देशमुख, एस.के.पवार, प्राचार्या मिना गायकवाड, हरवाळकर,श्रावण बिराजदार, शिवराज पाटील, अमोगसिध्द मुंजे, ललिता टेळे यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन जवाहर मोरे यांनी केले.



### आ. देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान, नेत्र तपासणी शिबीर

**सोलापूर :** आमदार विजयकुमार देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर, मोफत नेत्र शस्त्रक्रिया व मोफत चष्मा वाटप आदी विविध समाजोपयोगी कार्यक्रम पार पडले. राजाभाऊ अलकोड मित्र परिवार व जयभारत तरुण मंडळ यांच्या विद्यमाने हा कार्यक्रम झाला. उद्‌घाटन नगरसेवक किरण देशमुख, नरेंद्र काळे यांच्या हस्ते झाला. प्रास्ताविक भालचंद्र म्हेत्रे तर आभारप्रदर्शन कल्याणी हलसंगी यांनी केले. कार्यक्रमास सुरेश मोडे, बापू कोकरे, करेप्पा जंगम, संतोष कदम, मारेप्पा कंपली, अनंत गोडबोलू, बसवराज केंगनाळकर उपस्थित होते. यासाठी राजाभाऊ अलकोड, अलझेंडे, राजू दिवेकर, सदानंद म्हेत्रे, सुमीत भंडारे, मिथून जंगम, प्रशांत म्हेत्रे, महेश म्हेत्रे, सुनील बरे, प्रथमेश पल्ले, राजेश म्हेत्रे, लक्ष्मण म्हेत्रे, आकाश म्हेत्रे, ऋषिकेश शिंदे, सुरज टेंगळे, नरेश जगले, निलेश शिंदे यांनी परिश्रम घेतले.



### चिखली ग्रामपंचायत सरपंचपदी केशर शिंदे

**चिखली :** मोहोळ तालुक्यातील चिखली ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी केशर शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. सरपंच बाळू मनोहर मेंढे यांच्या रिक्त जागी ही निवड केली. यावेळी सरपंच पदासाठी शिंदे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने मंडलाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी बालाजी नागटिळक यांनी शिंदे यांची बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी माधुरी वसेकर, तलाठी साहिल पठाण, पोलीस उपनिरीक्षक मारूती लोंढे, पोकॉ गणेश बुरगुटे, पोना सागर शिंदे, पोलीस पाटील विठ्ठल मते उपस्थित होते.

### डिप्लोमानंतर नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वेरीमध्ये पदवीची संधी

**पंढरपूर :** 'डिप्लोमा इंजिनिअरिंग अर्थात पदविका अभियांत्रिकी उत्तीर्ण झाल्यानंतर अनेक विद्यार्थी हे आर्थिक परिस्थितीमुळे अथवा इतर कारणांमुळे पदवीचे शिक्षण न घेता नोकरी करणे पसंत करतात. अशा नोकरी लागलेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्याची इच्छा असूनही पुढील पदवीचे शिक्षण घेता येत नाही, ही अनेक वर्षांची गरज ओळखून शासनाने स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये उच्च व तंत्रशिक्षण मंडळामार्फत डिप्लोमा झालेल्या विद्यार्थ्यांना पदवीचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिलेली आहे. आता अशा विद्यार्थ्यांना पदवीच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळणार आहे. प्रवेशानंतर विद्यार्थ्यांना वर्गात सक्तीने बसावेच असे बंधन नाही त्यामुळे विद्यार्थ्यांना पदवीचे शिक्षणही आता घेता येणार आहे.'येत्या दि. २५ ऑक्टोबरपर्यंत पदवी अभियांत्रिकेच्या थेट द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेत येणार आहे. अधिक माहितीसाठी प्रा.करण पाटील (९५९५९२११५४ ) व प्रा.पोपट आसबे ( ७८२१००४६४७) यांच्याशी संपर्क साधावा.

# होटगी-इंगळगी शिवारात उजनीचे पाणी आणणार

## देगाव जलसेतूचे काम वेगाने सुरु

**सुराज्य/सोलापूर**

देगाव जलसेतूचे काम प्रगतीपथावर असून, येत्या वर्षभरात होटगी, इंगळगी परिसरातील शेतीसाठी उजनीहून पाणी आणणार असल्याची ग्वाही आमदार सुभाष देशमुख यांनी दिली.

इंगळगी येथील जय भवानी नवरात्र उत्सव मंडळाच्या देवीची पूजा केल्यानंतर आ. देशमुख यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला.

यावेळी रामप्पा चिवडशेट्टी, शिवानंद हत्तुरे, राहुल वंजारे, सागर धुळवे, अमर पाटील, विद्याधर वळसंगे, प्रधान गुरव, भुताळी घोडके, रफिक शेख, भीमाशंकर कोळी, प्रदीप घोडके, दत्ता बोरकर, इंद्रजीत माने, राजशेखर बंडगर, जगदीश दसाडे, सैपन शेख, इसाक शेख, नूर बागवान, जिलानी बागवान, रेवण स्वामी उपस्थित होते.

सूत्रसंचालन भीमाशंकर बंदीछोडे यांनी केले.

**यंदा इंगळगी- धुबधुबी प्रकल्प कोरडेच**

यंदा इंगळगी-शिरवळ धुबधुबी प्रकल्प पाण्याअभावी कोरडे असल्याने गाळ काढण्याचे कामही सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आ. देशमुख म्हणाले की, होटगी, इंगळगी परिसरात उजनीहून पाणी आणण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून माझे प्रयत्न सुरू आहेत. पाणी आले तर येथील परिसर निश्चित समृद्ध बनणार आहे.

देगाव जलसेतूचे काम वेगाने सुरू आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात होटगी व नंतर इंगळगी परिसरात पाणी येणार हे निश्चित आहे.

**इंगळगीमध्ये आमदार सुभाष देशमुख यांची ग्वाही**



## सप्तसुरांच्या कलाविष्काराने नवरात्र संगीत महोत्सवाची सांगता

**सुराज्य/पंढरपूर**



पंढरपूरः रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवामध्ये गीत गायक करताना कलाकार मंडळी.

रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवाची सांगता पंढरपुरातील स्थानिक कलाकारांच्या भरतनाट्यम् आणि नटराज नृत्य क्लासेस व सुशील कुलकर्णीनिर्मित मैफील सप्तसुरांची या कलाविष्काराने झाली.

प्रथम सत्रात नटराज नृत्य क्लासेसच्या संचालिका लक्ष्मी बडवे यांच्या मार्गदर्शनाखाली ५१ नवदुर्गांनी वसुदैवकम कुटुंबकम् या भरतनाट्यमने कलारसिकांना मंत्रमुग्ध केले. उद्‌घाटन डॉ वर्षा काणे, डॉ. प्रसाद कुलकर्णी श्रीकांत महाजन, नारायण बडवे यांच्या हस्ते झाले. द्वितीय सत्रात शकुंतला नडगिरे, श्रीकांत कुलकर्णी, सुशील कुलकर्णी, आप्पासाहेब चुंबळकर, योगिता ताटे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली.

या कार्यक्रमात अनेक भक्तीगित, गाण्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. योगिनी ताटे, श्रीकांत कुलकर्णी प्रसाद खिरस्ते, आदिती परचंडे यांना तबला सुशील कुलकर्णी, हार्मोनियम गायन आप्पासाहेब चुंबळकर, सिंथेसाईजर कल्याण कवडी यांनी साथसंगत केली. सुंदर निवेदन ऋतुजा फुलकर यांनी केले. यावेळी मंदिर कर्मचारी वर्गाचाही सन्मान करण्यात आला. सूत्रसंचलन विक्रम बिस्किटे यांनी केले.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर आयोजित सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम मोठ्या उत्साही वातावरणात पार पडली.



स्वच्छता मोहिमेत सहभागी छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजसेवक दिसत आहेत.

## रस्त्यावरील खडीचा भाविकांना त्रास

**सुराज्य/सोलापूर**

**▶▶ छ. शिवाजी मुस्लीम ब्रिगेडची स्वच्छता मोहीम**

**▶▶ भाविकांनी गुलाबाचे पुष्प देऊन केले स्वागत**

नवरात्रौत्सवात अनवाणी पायाने रूपाभवानी दर्शनाला येणाऱ्या अबालवृद्धांपासून ते महिला भाविकांना रस्त्यावर पसरलेल्या खडीचा त्रास सहन करावा लागत होता. त्यापार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेडने भक्तांना होणारा हा त्रास पाहून स्वच्छता मोहीम राबविली.

नवरात्रौत्सवापूर्वी महापालिकेने रूपा भवानी मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावरील खड्डे बुजवले. परंतु, हे काम व्यवस्थित झाली नाही. रस्त्यावर तशीच शिल्लक खडी ठेवल्याने अनेक ठिकाणी ती रस्त्यावर पसरली आहे. त्यामुळे रूपाभवानी दर्शनाला अनवाणी जाणाऱ्या भाविकांच्या पायात रुतू लागली. मार्केट यार्ड ते बोरामणी नाका या रस्त्यावरील सर्व खडी ब्रिग्रेडचे अध्यक्ष मतीन बागवान, मार्गदर्शक राम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पदाधिकाऱ्यांनी रस्त्यावर पसरलेली खडी तासात स्वच्छ केली. यावेळी भाविकांनी रस्ता स्वच्छ करणाऱ्या तरुणांना गुलाबाचे पुष्प देऊन पाठीवर थाप दिली.

यावेळी शफीक रचभरे, राजू हुंडेकरी, जावेद बद्दी, तनवीर गुलजार, बशीर शेख, कादर भागानगरी, अफरोज तांबोळी, कय्युम बलोलखान, पोपट भोसले, प्रकाश शिंदे, लक्ष्मण भोसले, सादीक मुजावर, कय्युम मोहळकर आदींनी स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदवला.



सोलापूर : शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त होटगी रोडवरील राघवेंद्रनगर येथे दांडियाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवात युवती आणि महिला दांडियाच्या तालावर थिरकल्या. पारंपारिक वेशभुषेत सहभागी झालेल्या युवती व महिला. यंदाचे हे दुसरे वर्षे आहे.

### एजाज चौकी यांना आयटी आदर्श शिक्षक पुरस्कार

**सोलापूर :** जागतिक शिक्षक दिनानिमित्त इस्माईल बेग मोहम्मद हायस्कूल, मुंबई येथील एजाज अहमद चौकी यांना आयटी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे.

अखिल भारतीय आदर्श शिक्षक संघातर्फे आयोजित हा पुरस्कार सोहळा मन्नत हॉल, मुम्बरा येथे पार पडला. यावेळी सय्यद शरीफ, फारुक सय्यद, प्राचार्य झियाउर रहमान अन्सारी उपस्थित होते.

## कुलगुरू डॉ. महानवर यांच्याकडून प्रभारी अधिष्ठातांच्या नेमणुका जाहीर

**सुराज्य/सोलापूर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे नूतन कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांच्या प्रभारी अधिष्ठाता व प्रभारी सहयोगी अधिष्ठातांच्या नेमणुका जाहीर करून संबंधितांना नियुक्तीपत्रे दिली.

यानुसार विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठातापदी दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्समधील डॉ. लक्ष्मीकांत दामा यांची तर प्रभारी सहयोगी अधिष्ठाता म्हणून स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पंढरपूर येथील डॉ. प्रशांत पवार यांची नियुक्ती केली आहे. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता म्हणून डी. ए. व्ही. कॉलेज ऑफ कॉमर्स येथील डॉ. शिवाजी शिंदे यांची निवड केली आहे. मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी संगमेश्वर महाविद्यालयातील डॉ. वसंत कोरे यांची तर प्रभारी सहयोगी अधिष्ठाता म्हणून डॉ. एजाज तांबोळी यांची नियुक्ती झाली आहे.

आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठातापदी वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. राजशेखर हिरेमठ यांची तर डॉ. विठ्ठल किडगावकर यांची प्रभारी सहयोगी अधिष्ठाता म्हणून निवड झाली आहे. कुलगुरू डॉ. महानवर यांनी सर्व प्रभारी अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता यांना नियुक्ती पत्रे देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलसचिव योगिनी घारे उपस्थित होते.

## श्रीपाद येरमाळकर यांनी सादर केल्या नाट्यछटा

### नाट्य परिषदेचा रंगवर्धन उपक्रम

**सुराज्य/सोलापूर**



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेच्यावतीने आयोजित रंगवर्धन उपक्रमात सोलापुरातील ज्येष्ठ नाट्य कलावंत श्रीपाद येरमाळकर यांनी रसिकमान्य भूमिकांच संस्मरण अर्थात गाजलेल्या नाटकातील प्रवेश सादर करून रसिकांची वाहवा मिळविली.

'इथे ओशाळला मृत्यू' या नाटकातील छत्रपती संभाजी महाराजांचे अंधारकोठडीतील स्वगत, 'वऱ्हाड निघालय लंडनला' या एकपात्री प्रयोगातील पाच पात्रांचे सादरीकरण, 'इथे ओशाळला मृत्यू' नाटकातील संभाजी महाराज आणि औरंगजेबाचा एकपात्री प्रयोग असे नाट्यप्रयोग केले. आपल्या दमदार आवाजातून आणि सूचक देहबोलीतून येरमाळकर यांनी एका वेगळ्या वातावरणाचा अनुभव रसिक प्रेक्षकांना दिला.

प्रारंभी श्रीपाद येरमाळकर यांचा सत्कार ज्येष्ठ रंगकर्मी गफूर बागवान यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक, आभारप्रदर्शन सह-कार्यवाह सुहास मार्डीकर यांनी केले. यावेळी परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे, सुनील गुरव, अमोल धाबळे, राजा राजेशचंद्र, हिरालाल धुळम, व्यंकटेश रंगम, डॉ. नसीम पठाण, निता येरमाळकर, आनंद खरबस, सुखदा गुरव, मल्लिकार्जुन कावळे, डॉ.राजीव मोहोळकर उपस्थित होते.

# आ.सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त विविध पुरस्कार जाहीर

### आज वितरण

**सुराज्य/सोलापूर**

पुणे विभागाचे माजी शिक्षक आ. दत्तात्रय सावंत प्रणित महाराष्ट्र राज्य शाळा कृती समिती माढा तालुका यांच्यावतीने दत्तात्रय सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त शिक्षण क्षेत्रातील विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. हे पुरस्कार बुधवार, दि. २४ ऑक्टोबर २०२३ रोजी ट्विंकल स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, टेंभुर्णी येथे सकाळी १०.३० वाजता वितरीत करण्यात येणार आहेत.

यावेळी आ. दत्तात्रय सावंत, सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह शिंदे उपस्थित राहणार आहेत. तरी माढा तालुक्यातील शिक्षकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे गजानन लावर यांनी केले आहे.

या पुरस्कारामध्ये माढा तालुक्यातील शिक्षण क्षेत्रामध्ये क्रांती घडविणाऱ्या आदर्श शाळा, आदर्श शिक्षक, आदर्श मुख्याध्यापक व आदर्श पत्रकार अशांना कृतिशील म्हणून पुरस्काराने गौरविण्यात येत आहे. त्यामध्ये आदर्श पब्लिक स्कूल कुर्डुवाडी, लक्ष्मी आनंद विद्या मंदिर टेंभुर्णी, विमलेश्वर विद्यालय बेंबळे, महात्मा फुले विद्यालय टेंभुर्णी या शाळांना आदर्श शाळा पुरस्कार देण्यात येणार आहे.

ट्विंकल स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या प्रा. रेखा हरिचंद्र गाडेकर, श्री गणपती फार्मासिटिकल इन्स्टिट्यूट अकोले खुर्दच्या प्रा. रुपाली बेंदगुडे, रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल टेंभुर्णीचे मुख्याध्यापक साहेबराव दत्तू लेंडवे, न्यू इंग्लिश स्कूल तुळशीचे बापू भागवत महाडिक यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

कन्या प्रशालेचे क्रीडाशिक्षक अर्जुन खटके, कै.विठ्ठलराव शिंदे विद्यालय आडेगावचे सहशिक्षक बाळासाहेब चोपडे, महात्मा फुले उच्च माध्यमिक विज्ञान व कला महाविद्यालय कुर्डवाडीचे दत्तात्रय खटके, प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मेडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज हरिनगर, बेंबळेच्या प्रा. सुषमा चंदनकर, जनता विद्यालय व ज्युनियर कॉलेज टेंभुर्णीच्या प्रा.जयश्री थोरात, सुगंधा पाटील विद्यालय चिंचोलीचे संजय गोसावी, बबनराव शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अकोले खुर्दचे संभाजी अनपट, संजयमामा शिंदे विद्यालय कुर्डुवाडीचे श्रीकांत सावंत, महात्मा फुले विद्यालय वरवडचे संतोष गुरव यांना आदर्श कृतिशील शिक्षक पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच सदाशिव पवार व गणेश पोळ यांना आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर झालेला आहे. अशी माहिती प्रा. हरिश्चंद्र गाडेकर यांनी दिली आहे.

## तेलुगू अभिनेत्रीच्या उपस्थितीत रंगला गरबा, दांडिया, ब्रतुकम्मा उत्सव

**सुराज्य/सोलापूर**

तेलुगू सिनेअभिनेत्री आरोहीच्या उपस्थितीत पूर्वभागातील महिला आणि युवा-युवतींनी बहारदार गरबा, दांडियासह 'ब्रतुकम्मा ब्रतुकम्मा उव्यालो'च्या गाण्यावर फेर धरून जल्लोष केला.

अक्कलकोट रोड येथील अक्षय ग्रँड येथे दोन दिवसीय गरबा व दांडिया कार्यक्रम पार पडला. स्नेहारिका ग्रुप प्रस्तुत पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली महिला संघम्, पद्मशाली युवक संघटना, हरिओम वीणकर बाग बहुउद्देशीय संस्था व अक्षय ग्रँड यांच्या विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी अजय बुरा, तेलुगू अभिनेत्री आरोही, महेश कोठे, गणेश पेनगोंडा, मनपा अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे व जयदेवी कारंजे, पांडुरंग दिड्डी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी सुधाकर गुंडेली, सिताराम महाकांळ, सुरेश मिठ्ठाकोल, संतोष गड्डम, चाटला पैठणी, डॉ. विजय देगावकर, गोपीकृष्ण वड्डेपल्ली,



अक्षय ग्रँड येथे आयोजित गरबा, दांडिया, ब्रतुकम्मा कार्यक्रमाप्रसंगी तेलुगू सिनेअभिनेत्री आरोहीसोबत पूर्व भागातील समाज बांधव, युवक-युवती, महिला वर्ग.

अजय पोन्नम, बाकळे, श्रीकांत फोटो स्टुडिओ, हरिप्रिया सारीज, उदगिरी एलआयसी एजंट, किरण पामू, श्रीधर वडनाल, राहूल गोली, अंबादास बिंगी, लड्डू मादास, दयानंद मामडयाल, रेणुका बुधारम आदी उपस्थित होते. यासाठी अक्षय ग्रँडचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर अंबाल, समन्वयक व्यंकटेश दोंता, मनोहर माचर्ला, कुमारगौरव कुडक्याल, श्रीकांत दासरी, आकाश अंबाल, नयन दोंता, किरण अंबाल, नवल दोंता व परिक्षक यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन ऐश्वर्या हिबारे हिने केले.

## संक्षिप्त वृत्त...



### पिलीव येथे लाभार्थ्यांना पेटी वाटप

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील रणजीत सातपुते यांच्या प्रज्ञा ई-सेवा केंद्रामध्ये बांधकाम कामगार योजनेची व इतर शासकीय योजनांची संपूर्ण माहिती मिळेल. अगदी अल्प दरात सर्व योजनांचा लाभ मिळेल, असे विकास धाइंजे यांनी सांगितले. ते प्रज्ञा इ-सेवा केंद्रामार्फत आयोजित केलेल्या पेटी वाटप कार्यक्रमात बोलत होते. प्रज्ञा ई-सेवा केंद्राच्या विद्यमाने रणजीत सातपुते यांनी बांधकाम कामगार पेटी योजनेमार्फत बांधकाम कामगारांना एकूण १२ आवश्यक वस्तू मिळवून दिल्याचे नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीसचे राज्य सचिव वैभव गीते यांनी सांगितले. यावेळी डॉ.कुमार लोंढे, मैत्री प्रतिष्ठानचे महेश शिंदे, यासीन पठाण, दामोदर लोखंडे, कुमार लोखंडे, देवा धायगुडे, गोविंद वाघमारे, नागेश सातपुते, सचिन वाघमारे उपस्थित होते.



### सांगोल्यातील गरबा,दांडिया महोत्सवाला महिलांचा प्रतिसाद

**सांगोला :** भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत मित्र परिवाराच्यावतीने छत्रपती शिवाजीनगर नवरात्रोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित दांडिया, गरबा नाईट स्पर्धेला महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. या स्पर्धा सांगोला शहरातील न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर झाल्या. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट दांडिया जोडीस ७००१ रुपयांचे बक्षीस, सर्वोत्कृष्ट गरबा जोडी ७००१ रुपये, सर्वोत्कृष्ट दांडिया ग्रुप ७००१ रुपये, सर्वोत्कृष्ट दांडिया ग्रुप ७००१ रुपये अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. लकी ड्रॉ काढण्यात येणार आहे. यावेळी आटा चक्की, मायक्रो ओव्हन, मिक्सर, तीन अँड्रॉइड मोबाईल, ३ पैठणी साडी अशी बक्षिसे देणार आहेत.



### नातेपुते परिसरातील २५ हजार नागरिकांना हरभरा डाळ वाटप

**नातेपुते :** शिवसेनेच्या वतीने भारत सरकारच्या ग्राहक व्यवहार विभाग आणि नाफेड यांच्यामार्फत ६० रुपये किलो दराने नातेपुते व परिसरातील २५ हजार नागरिकांना हरभरा डाळीचे वाटप करण्यात आले. शिवसेनेचे माळशिरस तालुका प्रमुख राजकुमार हिवरकर-पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली नातेपुते येथील शिवसेना भवन येथे हरभरा डाळ वाटपाचा उपक्रम सुरू असून, आत्तापर्यंत २५ हजार महिला व पुरुषांना हरभरा डाळ वाटप केली आहे. यासाठी तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर-पाटील परीश्रम घेत आहेत.



### उळेवाडी ग्रा.पं. निवडणुकीत भाजपच्या स्वाती घायाळ सलग चौथ्यांदा बिनविरोध

**उत्तर सोलापूर :** नुकत्याच जाहीर झालेल्या पंचवार्षिक ग्रामपंचायत निवडणुकीत उळेवाडीचे भाजपचे उमेदवार स्वाती ज्ञानेश्वर घायाळ यांनी ग्रामपंचायत निवडणुकीत सलग चार वेळा बिनविरोध सदस्या निवडून येऊन इतिहास रचला.याप्रसंगी माजी सरपंच शरणप्पा चौंडे, सदाशिव चौगुले, लक्ष्मण गावडे, विजय घायाळ, सचिन माळवदकर, संदीप येरवडे, विजय घायाळ, वसीम कारभारी, पद्मिनी घायाळ, शामल गाडेकर, अमोल घायाळ, तानाजी बनसोडे, बजरंग डोंगरे, जगदीश कांबळे, केराप्पा कांबळे, फारुख शेख, प्रदीप गाडेकर, सोमनाथ पवार, रामलिंग घायाळ उपस्थित होते.

# द्राक्ष बेदाणा शालेय पोषण आहारात आणण्यासाठी प्रयत्नशील

## उपमुख्यमंत्री : बबनराव शिंदे यांना मंत्रीपद देण्याची अजितदादांकडे मागणी

सुराज्य/कुर्डुवाडी

द्राक्ष बेदाणे शालेय पोषण आहारामध्ये समाविष्ट करण्यासाठी बैठक घेऊन आहार योजनेत त्रुटी राहणार यासाठी काम करून ही मागणी पूर्ण करू. काही पुढाऱ्यांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे की, कृष्णेचे पाणी भिमेत आणायचे पण या योजनेचा अभ्यास केला असून, माझ्या हयातीतरी हे शक्य नसल्याची स्पष्ट कबुली उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

पिंपळनेर (माढा) येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्या २३ व्या गळीत हंगामाच्या शुभारंभानंतर आयोजित शेतकरी संवाद मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते.




पिंपळनेर : येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम आणि शेतकरी संवाद मेळाव्याप्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर दिसत आहेत.

यावेळी विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याच्या २३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ ज्येष्ठ सभासदोच्या हस्ते मोळी टाकून करण्यात आला. अध्यक्षस्थानी आमदार बबनराव शिंदे होते. याप्रसंगी आमदार संजय शिंदे, मोहोळचे आमदार यशवंतराव माने, माजी आमदार राजन पाटील, दीपक साळुंके-पाटील, कल्याणराव काळे, उमेश पाटील, रामभाऊ शिंदे, अशोक लुणावत, रणजितसिंह शिंदे, शिवाजी पाटील-चांदजकर, सुहास पाटील, संजय पाटील-भीमानगरकर, वामनराव उबाळे, सुरेश बागल, बंडूनाना ढवळे, निरंजन भूमकर, उमेश कदम, अर्जुनराव बागल, दत्ताजी काकडे, शहाजी शिंदे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले की, सरकारमध्ये असल्याशिवाय प्रश्न सुटणार नव्हते. म्हणूनच आम्ही हा निर्णय घेतला. अनेक प्रश्न सुटू लागले आहेत. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मदत केल्याचे ते म्हणाले. आम्ही पूर्वीपासूनच मराठा आरक्षणाच्या बाजूनेच आहोत, मनोज जरांगे-पाटलांच्या आंदोलनाचा उल्लेख करून ते म्हणाले, प्रत्येक समाजातील प्रत्येक व्यक्तीला आंदोलन करण्याचा अधिकार घटनेने दिला आहे.

आमदार बबनराव शिंदे म्हणाले, कारखान्याच्या रोज पंधरा हजार टनाचे क्रशिंग वाढवण्यासाठी मंजुरी द्यावी, तालुक्यातील उर्वरित पाणी योजना रखडल्याने तो भाग जिरायत राहिल्याचे सांगितले,माढ्यात उभारलेल्या नेत्रालयाचा महात्मा फुले योजनेत समावेश करून सर्वसामान्य नागरिकांना लाभ होईल, यासाठी प्रयत्न करावेत. शिखर शिंगणापूर रस्ता त्वरित व्हावा अशी मागणी करून तालुक्याच्या विकासाची मागणी करणाऱ्या प्रत्येकाच्या पाठीशी आहे. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले, बाळासाहेब चवरे, रवींद्र जाधव यांनी तर आभारप्रदर्शन रमेश पाटील यांनी केले.

### मंत्रीपदाचे आश्वासन

आमदार बबनराव शिंदे यांना मंत्री करण्यासाठी इतकी वर्षे आम्ही वरिष्ठांशी बोलून निर्णय घेऊ, असे सांगत होते. पण आता तीन पक्षांच्या सरकारमध्ये शिंदे व फडणवीस यांच्याशी बोलून घेऊन तुम्हाला नाराज करणार नाही, एवढी खात्री मी तुम्हाला देतो, असे अजितदादा पवार म्हणाले.

### बबनराव शिंदे यांना मंत्रीपद देण्याची मागणी

यावेळी प्रास्ताविकात रणजितसिंह शिंदे यांनी मराठा आरक्षण मिळालेच पाहिजे, अशी प्रमुख मागणी अजित पवार यांच्यासमोर मांडली. पंचायत समितीचे माजी उपसभापती बंडूनाना ढवळे, शिवाजी पाटील-चांदजकर, संजय पाटील-भीमानगरकर यांनी बबनदादांना सहकार मंत्री करण्याची मागणी केली. सुजीत भोसले यांनी रणजितसिंह शिंदे यांना आगामी काळातील आमदारकीचे तिकीट देण्याची मागणी केली.

### अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीची दुय्यम बाजार पेठ, माळशिरस पेट्रोलपंपाचे उद्घाटन

**अकलूज :** बाजार समितीचे दुय्यम बाजार पेठ, माळशिरस येथील पेट्रोल पंपाच्या विक्री सेवेचा शुभारंभ मंगळवार, दि. २४ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर दु. ३ वाजता विजयसिंह मोहिते-पाटील माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते व जयसिंह मोहिते-पाटील चेअरमन स.म.शं.मो.पा.स.सा.का. लि.शंकरनगर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

यावेळी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, आ. राम सातपुते, धैर्यशील मोहिते-पाटील, अमीत कलनगुटकर, मिलिंद कुलकर्णी, संजीवनी पाटील, डॉ. आप्पासाहेब देशमुख उपस्थित रहाणार आहेत.

यावेळी माळशिरस तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विकास सोसायटीचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक, शेतकरी, व्यापारी व तत्सम बाजार घटकांनी उपस्थित रहावे, असे आवहन बाजार समितीचे सभापती मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांनी केले आहे. बाजार समितीचे मुख्य मार्केट व दुय्यम बाजारपेठ येथे एकूण ७० एकर क्षेत्र असून नियमितपणे भविष्यकालीन गरजांचा विचार करून अद्ययावत विकास आराखडा तयार केला आहे. बाजार समितीच्या मुख्य यार्ड व दुय्यम बाजारपेठेमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्याबरोबरच विविध उपक्रम राबवून विकासात्मक कामामध्ये गरुडभरारी घेतली आहे. म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्रात एक अग्रगण्य बाजार समिती म्हणून ओळख झाली आहे.

# ‘भीमा’ देणार २४०० रुपयांची पहिली उचल

सुराज्य/मोहोळ

शेतकरी, सभासदांना टाकळी सिकंदर येथील भीमा सहकारी साखर कारखाना २४०० रुपयांची पहिली उचल देणार असल्याची घोषणा संचालक व खा. धनंजय महाडीक यांनी केली आहे.

कारखाना कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनससह एक पगार आणि १५ किलो साखर मोफत देण्याची घोषणा चेअरमन विश्वराज महाडीक यांनी केली. भीमा सहकारी साखर कारखाना लि., टाकळी सिकंदर कारखान्याचा ४४ वा बॉयलर अग्नी प्रदीपन आणि गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रम खा. धनंजय महाडीक यांच्या हस्ते सोमवारी झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बोलताना चेअरमन विश्वराज महाडिक म्हणाले, गळीत हंगामात कारखान्याकडे गाळपास येणाऱ्या उसाचे बिल पाच दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असून, यावर्षी भीमा कारखान्याचा रोख काटा पेमेंटकडे असल्याचेही सांगितले.

- धनंजय महाडीक यांची घोषणा
- गाळपास येणाऱ्या उसाचे बिल पाच दिवसांत खात्यात जमा करण्याचे आश्वासन

राज्य सरकारने यावर्षीचा गळीत हंगाम सुरु करण्यासाठी कारखान्यांना दिं. १ नोव्हेंबरपासून गाळपास परवानगी देण्याचा निर्णय घेतला. अद्यापही सोलापूर जिल्ह्यातील कोणत्याही कारखान्याने पहिली उचल जाहीर केलेली नाही. खासदार महाडिक यांनी २४०० रुपये पहिली उचल देण्याची घोषणा केली आणि ऊसदराची कोंडी फोडली.



मोहोळ : भीमा कारखान्याच्या गळीत हंगामाच्या उद्घाटनप्रसंगी खा. धनंजय महाडीक, विश्वनाथ महाडीक यांच्यासह मान्यवर दिसत आहेत.

### विश्वराज यांनी गिरवला आजोबांचा कित्ता

कारखान्याचे संस्थापक व आजोबा पैलवान भीमराव महादीक हेदेखील अनेक मजेशीर आणि बोधपूर्ण गोष्टी सांगत असतं. आपल्या आजोबांचाच गोष्टी सांगण्याचा कित्ता गिरवत विश्वराज यांनी आबुराव आणि छबुराव या व्यापाऱ्यांच्या गोष्टीतून शेतकऱ्यांना काटामारीपासून सावध राहून चोख काटा असणाऱ्या भीमा कारखान्यालाच ऊस घालण्याचे आवाहन केले. आपले चुलत आजोबा माजी आमदार महादेवराव महाडीक यांच्याकडून मिळालेल्या शिकवणीचा दाखला मी कारखान्याचा एक सेवक असल्याचे सांगितले. हंगाम यशस्वी करण्यासाठी खांद्याला खांदा लावून तुमच्यासोबत उभा आहे, असा विश्वास कर्मचाऱ्यांना दिला.

### भीमाचा अडचणीचा काळ संपला..

भीमा कारखान्याचा अडचणींचा काळ संपला आहे. आता चांगला काळ सुरु आहे, असे सांगत विश्वराज यांच्या पाचव्याच दिवशी बिलं जमा करण्याच्या निर्णयामागे त्यांचा अभ्यास, नियोजन याचा दाखला खा. धनंजय महाडिक यांनी दिला. विश्वराज यांनी केवळ घोषणा केलेली नाही तर अगदी शेवटच्या आठवड्यात तुटणाऱ्या उसाचे पेमेंटसुद्धा पाचव्याच दिवशी मिळेल, याचे काटेकोरपणे नियोजन केलेले आहे. याकामात त्यांच्या शिक्षणाचा त्यांना फायदा होईल. अशी खात्री खा. महाडिक यांनी व्यक्त केली.



## अकोलेकाटीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संचलन

सुराज्य/उत्तर सोलापूर

उत्तर तालुक्यातील अकोलेकाटी येथे विजयादशमीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने शस्त्र पूजन व संचलन करण्यात आले.

प्रारंभी मुख्य वेशीत भगव्या ध्वजाचे रोहन करून संघाच्या पद्य व प्रार्थना म्हणून संचलनाची सुरुवात झाली. यावेळी चरणसिंग क्षीरसागर, प्रमुख वक्त रंगनाथ बंकापूर, तालुका संघचालक चंद्रकांत गडेकर यांच्या हस्ते पूजन झाले. यावेळी तालुका कार्यवाह संजय राठोड, ज्येष्ठ स्वयंसेवक शिवाजी सोनार, विष्णू जगताप, डॉ.रिसवडकर, मोहन इनामदार, विठ्ठल कदम यांच्यासह १०० ते १५० स्वयंसेवक, हिंदू प्रेमी उपस्थित होते.

## गौडवाडीत डाळिंब शेतीशाळा कार्यक्रम

**जमिनीच्या आरोग्याकडे लक्ष देऊन संतुलित पिकपोषण करावे : डॉ. हरिहर कौसडीकर**

सुराज्य/सांगोला



गौडवाडी : येथील कल्लप्पा गडदे यांच्या डाळिंब शेतात डाळिंब शेतीशाळा व किसान गोष्टी कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करताना मान्यवर.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग, प्रकल्प संचालक,आत्मा सोलापूर व गुरूकृपा ॲग्री मार्ट शेतकरी गट, गौडवाडी यांच्या विद्यमाने डाळिंब पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयावर 'डाळिंब शेतीशाळा व किसान गोष्टी कार्यक्रम' गौडवाडीतील कल्लप्पा गडदे यांच्या डाळिंब शेतात पार पडला.

यावेळी डॉ. हरिहर के. कौसडीकर यांनी डाळिंब पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन केले. उत्तम डाळिंब उत्पादनासाठी मुख्यतः जमिनीच्या आरोग्याकडे लक्ष देऊन संतुलित पीक पोषण करण्याचे आवाहन केले.

यावेळी प्रभाकर चांदणे, बाळासाहेब लांडगे, विनायक काशिद, भाग्यश्री पाटील, उपस्थित होते.

यासाठी गुरूकृपा ॲग्री मार्ट शेतकरी गटाचे सदस्य नाना माळी, आण्णा गडदे , कल्लप्पा गडदे, शिवाजी हिप्परकर, कृषी सहाय्यक मयुर माळी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक मेघराज पोळ, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थाक श्रीकांत सोनवणे यांनी परिश्रम घेतले.

सूत्रसंचलन कृषी पर्यवेक्षक श्रीधर शेजवळ यांनी तर आभार प्रदर्शन कृषी पर्यवेक्षक सतीष देठे यांनी केले.

### ‘ध्येय, जिद्द व सातत्यातून यश प्राप्ती’

**उत्तर सोलापूर :** प्रत्येक व्यक्तीने मनात ध्येय, जिद्द व सातत्य ठेवले तर नक्कीच यश प्राप्ती होते, असे प्रतिपादन दक्षिण तालुका पंचायत समिती गट विकास अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी केले.



किसनराव मागास समाज शिक्षण प्रसारक मंडळ व उमाकांत राठोड प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त मुळेगाव तांडा येथे बौद्धिक व्याख्यानमालेत ते बोलत होते. उमाकांत राठोड प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयकुमार राठोड यांनी अध्यक्षीय भाषण केले. यावेळी राज साळुंखे, ननवरे, वजीर भाई, नागनाथ जाधव, राठोड, मनोज राठोड उपस्थित होते.

**Classified**

**वधू-वर विषयक**

वधू २६, उंची ५.३, रंग - गोरा, १२ वी., हिंदू - ब्राह्मण, मुलीला आई नाही. वडील मंदिरात पुजारी आहेत. गरीब घरातील मुलीकरीता सर्व जातीय सामान्य वर चालेल.

मो.नं. 8378879264, 8446068427

# अन्यथा धनगर समाज पुन्हा रस्त्यावर उतरेल

सुराज्य/सांगोला

'धनगर समाज आरक्षण राज्य सरकार देऊ शकतं. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना पत्र दिलं आहे. आरक्षण न मिळाल्यास २९ दिवसांत धनगर समाज पुन्हा रस्त्यावर उतरले' त्यास सरकार जबाबदार असेल. धनगर समाजासाठी आरक्षणाची मागणी करत भाजप आमदार गोपींचंद पडळकर यांनी घरचा आहेर देत सरकारला अल्टिमेट्म दिला आहे.



सांगोला तालुक्यातील आरेवाडी येथील बिरोबा बनात बहुजन समाजाचा दसरा मेळावा पार पडला. या मेळाव्यास धनगर समाजासह लिंगायत, रामोशी, बेडर समाजाचे समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बिरोबाच्या बनात दसरा मेळाव्यात पार पडतोय. राजे महाराजांच्या काळात ढोल वाजवला जात होता. आणि याचा निनाद वारंवार वाजवला पाहिजे, जेणेकरून प्रस्थापितांना धडकी भरली पाहिजे. आज अनेक प्रश्न मनात आहेत. ते सोडवण्यासाठी आपण झगडतोय. धनगर समाजाचे आरक्षण अंमलबजावणीसह अन्य समाजाच्या आरक्षण मागणीबाबत आ. पडळकर यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. यासाठी लिंगायत समाजाचे शिवानंद हैबतपुरे, बेडर रामोशी समाजाचे दौलत शितोळे, डॉ. अनिकेत देशमुख, ब्रम्हानंद पडळकर सुभाष मस्के, माऊली हळणवर आदी उपस्थित होते.

- बिरोबाच्या साक्षीने 'शिवमल्हार क्रांती सेने'ची स्थापना
- दसरा मेळाव्यात आ.पडळकरांची घोषणा,
- अन्यथा २९ दिवसांनंतर धनगर समाज पुन्हा रस्त्यावर उतरेल
- आ.पडळकरांचा सरकारला अल्टिमेट्स

### गरज पडेल तेथे बाळू मामा; अन् बापू बिरू वाटेगावकर व्हायचं!

आ. पडळकर म्हणाले, सरकारला माझा अल्टिमेटम आहे. तुम्ही काहीही करा आणि धनगर समाजातील लोकांना एसटीचा दाखल हातात द्या. कुणीही कितीही राजकारण केले तरी, धनगर समाज त्याला बळी पडणार नाही. मराठा आणि धनगर हे दोन मोठे समाज आहेत. गरज पडेल तेथे बाळू मामा व्हायचं आणि गरज पडेल तर बापू बिरू वाटेगावकर व्हायचं.

### विजेच्या पोलवरून पडल्याने जखमी

**सोलापूर :** विजेच्या पोलवर चढून काम करताना शॉक बसून खाली कोसळल्याने किरण बोलभाट (वय ३८, रामवाडी) हा गंभीर जखमी झाला. ही घटना डीआरएम कार्यालयाजवळ घडली. उपचारासाठी उमाकांत दराडे यांनी रुग्णालयात दाखल केले.

**कढईवर पडल्याने बालक भाजला**

खेळत असताना चुलीवरील तेलाच्या कढईवर पडल्याने यश गुरुपादप्पा स्वामी (वय -२) हा मुलगा भाजून जखमी झाला. ही घटना भारतरत्न इंदिरानगर येथे घडली.

# पैठण एमआयडीसीत छापा; २५० कोटींचे ड्रग्ज जप्त

✔ सुराज्य/छत्रपती संभाजीनगर

नाशिकमधील अंमली पदार्थांच्या उत्पादनाचे पितळ उघडे पडल्यानंतर राज्यभरात चिंता व्यक्त होत असतानाच, महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) पथकाने आणखी एका अमली पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या कंपनीचे कारस्थान उघडकीस आणले आहे. 'डीआयआर'च्या पुण्यातील पथकाने रविवारी ही कारवाई केली. पैठण येथील महालक्ष्मी इंडस्ट्रीजमध्ये हे उत्पादन केले जात असल्याची माहिती 'डीआयआर'च्यावतीने देण्यात आली आहे. एका उच्चभ्रू वसाहतीत राहणाऱ्या जितेशकुमार हिनोरिया प्रेमभाईजी याच्या घरातून २३ किलो कोकेन, एमडी, केटामाइन व ३० लाख रुपये रोकड या पथकाने जप्त केली. अंमली पदार्थांची किंमत २५० कोटी असल्याचे सांगितले जाते.

'डीआरआय'च्या पथकाने पैठण 'एमआयडीसी'च्या महालक्ष्मी इंड्रस्ट्रीजवर छापा मारून अंमली पदार्थ जप्त केले. या प्रकरणात जितेशकुमार हिनोरिया प्रेमभाईजी (४४) आणि संदीप शंकर कुमावत (४०) या दोघांना ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली. 'डीआरआय'च्या ताब्यात असताना एका आरोपीने आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. संदीप कुमावतला एक दिवसाच्या पोलीस कोठडीचे आदेश विशेष न्यायालयाने दिले.

डीआरआय पुणे विभागाला शहरात एका कारखान्यात अंमली पदार्थांची निर्मिती केली जात असल्याची माहिती मिळाली. यावरून पथकाने सापळा रचला. शुक्रवारी दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास कांचनवाडी भागात राहणारा जितेश हिनोरिया हा घराबाहेर फिरण्यासाठी आला असता त्याला पथकाने ताब्यात घेतले. ताब्यात घेतल्यानंतर त्याच्या घराची झडती घेण्यात आली. त्याच्या घरातून पथकाला २३ किलो कोकेन आणि २.९ मेफेड्रोन हे अमली पदार्थ जप्त करण्यात आले; तसेच ३० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली', अशी माहिती डीआरआयने दिली.

जितेश हिनोरिया याला ताब्यात घेऊन अंमली पदार्थाबाबत विचारणा केल्यानंतर त्याने दिलेल्या माहितीनंतर 'डीआरआय' विभागाने पैठण एमआयडीसीतील महालक्ष्मी इंड्रस्ट्रीज येथे छापा टाकला. या छाप्यात पथकाने ४.५ किलो एमडी, ४.३ किलो केटामाइन आणि ९.३ किलो एमडी मिश्रण जप्त केले. जप्त केलेल्या अंमली पदार्थाचे वजन १८ किलो दोन ग्रॅम असल्याची माहिती पथकाने दिली. पैठण येथील कंपनीतून संदीप शंकर कुमावत याला ताब्यात घेण्यात आले. कंपनीत अंमली पदार्थ तयार करण्यात असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

एकूण जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थांचे वजन ४४ किलो एक ग्रॅम आहे. अंमली पदार्थ व सायकोट्रॉपिक पदार्थांचे बाजारमूल्य २५० कोटी रुपये असल्याची माहिती देण्यात आली.

### औषधे म्हणून ड्रग्ज पुरवित होता

या प्रकरणात 'डीआयआर'च्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 'पैठण येथील कंपनीत गुजरात तसेच विविध भागांतून हे अंमली पदार्थ आणले जात होते. या कंपनीत औषधनिर्मितीच्या नावाखाली अंमली पदार्थाचा राज्यभरात आणि राज्याबाहेर पुरवठा होत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या प्रकरणात राज्यात विविध भागात अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.



### बाथरूमच्या काचेने स्वत:वर वार?

'डीआरआय' पथकाने ताब्यात घेतलेल्या जितेशकुमार हिनोरिया याला न्यायालयात हजर करण्यासाठी रविवारी सकाळी तयारी सुरू होती. जितेश बाथरूममध्ये गेला असता काच फुटल्याच्या आवाज आला. 'डीआरआय'च्या अधिकाऱ्याने बाथरूममध्ये धाव घेतली. हिनोरियाने काचेने स्वत:च्या मानेवर वार केल्याचे दिसून आले. 'डीआरआय'च्या अधिकाऱ्यांनी धाव घेऊन त्याला पकडले. जखमी अवस्थेत हिनोरियाला खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले, असे असल्याचे 'डीआरआय'च्या सूत्रांनी सांगितले.

---

## खंडाळीतील मारुती मंदिराजवळ मारहाण

✔ **मोहोळ** : खंडाळी येथे चिंचेचे झाड तोडल्याच्या कारणावरून लाथाबुक्क्या आणि लोखंडी गजाने मारहाण करून एकाला जखमी केले.





यासंदर्भात उत्तम यशवंत मुळे (वय-५५, मानेवस्ती, खंडाळी) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी बाळू मुळे, शुभम मुळे, सागर मुळे, शेखर मुळे (खंडाळी) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. जखमी उत्तम मुळे हे गावातील मारुती मंदिरात बसले होते. झाड तोडण्यास मुळे हिला तुच सांगितले. असे म्हणत त्यांना मारहाण केली. खाली कोसळल्यानंतर त्यांना मुळे याने लोखंडी गजाने डोक्यात मारहाण केली.

## सरपंचपदाचे ९ तर ३४ सदस्यांचे अर्ज छाननीत बाद

### ग्रामपंचायत निवडणूक : २५ ऑक्टोबरला अंतिम चित्र होणार स्पष्ट : गावागावात तापणार राजकारण

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील १०९ ग्रामपंचात निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सरपंच पदासाठी ६३२ तर सदस्यसाठी ३४८७ अर्ज दाखल झाले आहेत. सोमवार , दि. २३ ऑक्टोबरला दाखल उमेदवार आर्जची छाननी करण्यात आली यामध्ये माळशिरस वगळता ३४ सदस्य पदाचे तर ९ सरपंच पदाचे अर्ज बाद झाले आहेत. दि. २५ ऑक्टोबर दुपार तीनपर्यंत उमेदवारी अर्ज माघार घेण्याची वेळ आहे.

जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुका वगळता दहा तालुक्यातील १०९ ग्रामपंचातीची निवडणूक प्रक्रिया चालू आहे.१६ ते २० आक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची वेळ होती. यामध्ये करमाळा मधिल१६, माढा मधिल १४, बार्शीतील ५ मोहोळ मधिल २, पंढरपुरातील ३, माळशिरस मधिल १०, सांगोला ४,मंगळवेढा २७, दक्षिण सोलापूर १०, अक्कलकोट १८ ग्रामपंचातीचा समावेश आहे. १०९ ग्रामपंचाती मधील ३६८ प्रभागामधिल ९४५ सदस्य आणि १०९ सरपंच पदासाठी निवडणूक होत आहे.



४३ ग्रामपंचातच्या ५० प्रभागातील ३५ सदस्य आणि माळशिरस आणि माढा मधील दोन ग्रामपंचातीच्या सरपंच पदासाठी पोटनिवडणूक होत आहे. सदस्यसाठी आता पर्यंत सदस्यासाठी ११० तर सरपंचपदासाठी १० अर्ज दाखल झाले आहेत. सर्व अर्ज छाननी,ध्ये पात्र झाले आहे.

शुक्रवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवट्या दिवशी करमाळा तालुक्यात सदस्यसाठी ६३२ तर सरपंचपदासाठी ११०, माढा मध्ये सदस्यसाठी ५७०, सरपंचपदासाठी ९५, बार्शी मध्ये सदस्यसाठी १२१ तर सरपंचासाठी २२, मोहोळ मध्ये सदस्यासाठी ३५ तर सरपंचपसाठी ७, पंढरपुरात सदस्यसाठी १९४, सरपंच ३१. सांगोला मध्ये सदस्यासाठी २३९ सरपंचपदासाठी ४२, मंगळवेढा मध्ये सदस्यासाठी सर्वाधिक ९४६ तर सरपंचपदासाठी १७५, दक्षिण सोलापुरात सदस्यासाठी ३१७ सरपंचपदासाठी ५५ अक्कलकोटमध्ये सदस्यासाठी ४३३ तर सरपंच पदासाठी ९५ अर्ज दाखल झाले होते. तहसिल कार्यालयात झालेल्या छाननी मध्ये करमाळामध्ये सदस्याचे तीन, माढा मध्ये सदस्यांचे दोन सरपंच पदासाठीचेव तीन, पंरपुरात सदस्यांचे सहा सरपंच पदाचे दोन सांगोला मध्ये सदस्यापदासाठीचे सहा, मंगळवेढा मध्ये सदस्याचे सात, सरपंचपदाचा एक, दक्षिण सोलापूरात सदस्यांचे सहा. सरपंच पदाचे दोन तर अक्कलकोट मध्ये सदस्यांचे चार सरपंच पदाचा एक अर्ज असे सदस्यांचे ३४ रसपंचपदाचे ९ अर्ज बाद झाले आहेत.

माळशिरसची छाननी उशिरा पर्यंत चालू होती त्यामुळे अकडेवारी समजू शकली नाही २५ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज माघार घेण्याची वेळ आहे. त्यानंतर निवडणूकीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल.

## अफगाणिस्तानचा पाकिस्तानवर ऐतिहासिक विजय

✔ **चेन्नई** : चेन्नईतील चेपॉक मैदानावर झालेल्या वर्ल्डकपच्या एकदिवसीय सामन्यात अफगाणिस्तानने पाकिस्तानवर ८ गडी राखून विजय ऐतिहासिक विजय मिळवला.

प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने अफगाणिस्तानसमोर २८३ धावांचे लक्ष्य दिले होते. पाकिस्तानच्या गोलंदाजीसमोर आणि अफगाणिस्तानचा अनुभव लक्षात घेता ही धावसंख्या आव्हानात्मक होती. पण अफगाणिस्तानचे सलामीवीर तयारीत आले होते. रहमानउल्ला गुरबाज आणि इब्राहिम झारदान यांनी पहिल्या विकेटसाठी शतकी भागिदार करून विजयाचा पाया तयार केला. २२व्या षटकात गुरबाज बाद झाला. त्याने ५३ चेंडूत १ षटकार आणि ९ चौकारांसह ६५ धावा केल्या. गुरबाज आणि झारदान यांनी पहिल्या विकेटसाठी १३० धावांची भागिदारी केली. त्यानंतर आलेल्या रहमत शाह यांनी दुसऱ्या विकेटसाठी ६० धावा जोडल्या. झारदान शतक पूर्ण करेल असे वाटत असताना तो ८७ धावांवर बाद झाला. त्यानंतर कर्णधार हशमतुल्ला शाहिदीने शाहसोबत नाबाद भागिदारीकरून देशाला ऐतिहासिक असा विजय मिळून दिला.

## सोमवारी जिल्हा परिषद आवारात शुकशुकाट



✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या आवारातील अनेक कार्यालयात सोमवारी शुकसुकाट दिसून आला. त्याला कारणही तसेच होते. रविवार आणि मंगळवार असे दोन शासकीय सुट्टी. मध्येच सोमवार आला. त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांनी सलग सुट्टीचा उपभोग घेण्यासाठी कदाचित सोमवारी सुट्टी घेतली असावी, असेच सोमवारी जिल्हा परिषद आवारातील शुकशुकाटवरून दिसून आले.

मंगळवारचा दशहरा पण या दसऱ्याच्या आदल्या दिवशीच अनेक अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी दांडी मारल्याने कामावर मोठा परिणाम झाल्याचे दिसून आले.

सोमवारी केवळ एखादा अधिकारी, कर्मचारी वगळता अनेकांनी दांडी मारल्याने ग्रामीण भागातून येणारे लाभार्थी, अभ्यागन यांना आर्थिक आणि मानसिक भुर्दंड सहन करावा लागला, हे मात्र खरे. सोमवार हा आठवड्याचा महत्त्वाचा आणि कामाचा दिवस असतानादेखील कर्मचाऱ्यांनी दसऱ्याच्या आदल्या दिवशी दांडी मारल्याने कार्यालयीन कामकाज ठप्प झाले होते.

## लाचखोर पोलीस-वकील 'एसीबी'च्या जाळ्यात

✔ सुराज्य/पुणे



गुन्ह्यातील कागदपत्रे देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना भिगवण पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक आणि एका वकिलाला पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सापळा रचून रंगेहाथ पकडले आहे. भिगवण पोलीस ठाण्यासमोर रविवारी ही कारवाई करण्यात आली आहे.

भिगवण पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक प्रवीण सुग्रीव लोकरे (वय ५२) आणि अॅड. मधुकर विठ्ठल कोरडे (वय ३४, रा. कर्जत, जि. नगर) अशी लाच स्वीकारताना पकडण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. या प्रकरणी ४१ वर्षीय व्यक्तींने तक्रार दिली होती.

तक्रारदाराच्या वडिलांचे जून महिन्यात अपघाती निधन झाले आहे. त्यांना धडक देणाऱ्या वाहनाची इन्शुरन्सची कागदपत्रे आणि दाखल गुन्ह्यातील कागदपत्रे देण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण लोकरे व अॅड. मधुकर कोरडे यांनी तक्रारदाराकडे ३० हजार रूपयांची लाच मागितली. यानंतर तडजोड करून २० हजार रूपयांमध्ये कागदपत्रे देण्याचे ठरले. यानंतर तक्रारदार यांनी पुणे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात तक्रार दिली. तक्रार प्राप्त झाल्यानंतर 'एसीबी'च्या अधिकाऱ्यांनी १५ व १६ ऑक्टोबर रोजी पडताळणी केली

## निवडणुकीत उत्साह, ग्रामविकासात निरुत्साह

**दक्षिण तालुक्यातील ग्रामपंचायतमधील चित्र बदलण्याची गरज**

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण तालुक्यातील दहा ग्रामपंचायतीमध्ये राजकीय धुळवड सुरू आहे. दहा ग्रामपंचायतीसाठी मोठ्या चुरशींने सरपंच पदासाठी ५७ तर सदस्य पदासाठी ३२३ अर्ज दाखल झाले आहेत. ग्रामपंचायत निवडणुकीत अर्ज दाखल करताना ग्रामस्थांचा मोठा उत्साह असतो, मात्र पाच वर्षाचा कालावधीत गावचा विकास साधताना अनेक ठिकाणी निरुत्साह दिसून येतो. दक्षिण तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या बाबतीत हे चित्र बदलण्याची गरज निर्माण झाली आहे.


१० गावातून थेट जनतेतून सरपंचाची निवड होणार आहे. त्याकरिता १६ ते २० ऑक्टोंबर या पाच दिवसाच्या कालावधीत सरपंच पदासाठी ५७ तर सदस्य पदासाठी ३२३ उमेदवाराने आपले अर्ज दाखल केले आहेत. या पाच दिवसात तहसील कार्यालय व परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते. अर्जाची संख्या विचारात घेता, अर्ज दाखल करण्यासाठी प्रत्येक गावातील ग्रामस्थांत मोठा उत्साह दिसून आला.

पंचायत राज व्यवस्था मध्ये ग्रामपंचायतिला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. या माध्यमातून शेवटच्या घटकाचा विकास साधला जातो. तालुक्यातील हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या ग्रामपंचायतिने नावलौकिकी मिळवला आहे. यामध्ये ग्रामपंचायतीने विविध पारितोषिक पटकावत आपला डंका राज्य पातळी पर्यंत पोहोचवला आहे, मात्र असेच काम तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतींनी करणे गरजेचे आहे. यासाठी ग्रामस्थांचा सहभाग महत्त्वाचा आहे. राज्य व केंद्राकडून गावच्या विकासासाठी विविध स्पर्धा आहेत. त्यात सहभागी घेणे महत्त्वाचे आहे. शिक्षण, आरोग्य, पाणी, जमीन, स्वच्छता,पर्यावरण, कृषी या क्षेत्रात तालुक्यात भरेल कामाचा अभाव दिसून येत आहे.

ग्रामपंचायत म्हणजे फक्त रस्ते व गटारी बांधणे एवढेच काम आहे, हा समज बाजूला करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.गावातील मूलभूत सुविधांची पूर्तता ग्रामपंचायतींने करणे गरजेचे आहे. याकरिता ग्रामस्थ जसा निवडणुकीमध्ये उत्साह दाखवीतो तसाच उत्साह पाच वर्षे गावचा विकास करण्यासाठी दाखविली पाहिजे.

### छाननीअंती अवैध ठरविलेले अर्ज

ग्रामपंचायत निवडणुकीत अर्ज दाखल केलेल्या अर्जाची छाननी सोमवारी करण्यात आली. यामध्ये तालुक्यातील सरपंच पदासाठी अर्ज दाखल करण्यात आलेले कुसुर, खानापूर येथील पुजारी भौरम्मा गेनसिद्ध . कासेगाव येथील वाडकर शंकर मच्छिंद्र यांचा अर्ज अवैद्य झाला आहे.तर सदस्य पदी अवैद्य झालेले उमेदवार पुढील प्रमाणे शिरवळ येथील पाटील विद्याश्री मळसिद्ध, पुजारी प्रभावती ज्योतिबा. दोड्डी येथील सरस्वती उमाकांत येरवडे. उळे येथील खंडागळे नामदेव अभिमान. वळसंग येथील नदाफ राजे भाई अस्कर,. कुसुर येथील कोळी शिवम्मा मल्लाप्पा यांचे अर्ज अवैध ठरले आहे.



## महान क्रिकेटपटू बिशन सिंग बेदी यांचे निधन



✔ सुराज्य/नवी दिल्ली

भारतीय फिरकी गोलंदाजीतील चमकणारा एक अद्वितीय तारा सोमवारी निखळला. भारतीय फिरकीला ज्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवून दिला असे बिशनसिंग बेदी यांचे ७७ व्या वर्षी निधन झाले.

भारतीय संघाकडून १९६६ ते १९७७ या कालावधीत त्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली होती. बेदी-प्रसन्ना ही भारताची फिरकी जोडी चांगलीच प्रसिद्ध होती. पण त्यामधील आता बेदी यांनी सोमवारी या जगाचा निरोप घेतला. भारताचे फिरकी हे प्रमुख अस्त्र आहे हे जगाला दाखवून दिले ते बेदी यांनी. बेदी यांनी प्रसन्ना आणि चंद्रशेखर यांच्या साथीने जगाला आपल्या फिरकीच्या तालावर चांगलेच नाचवले होते.

भारतीय संघ जेव्हा १९७८ साली पाकिस्तानच्या दौऱ्यावर गेला होता तेव्हा त्यांच्याकडे नेतृत्व सोपवण्यात आले होते. आपल्या डावखुऱ्या फिरकीच्या जोरावर त्यांनी फलंदाजांना आपल्या तालावर नाचवले होते. डावखुऱ्या गोलंदाजींची फिरकी गोलंदाजी कशी असावी, याचा उत्तम वस्तुपाठ हा बेदी यांनी दाखवून दिला होता. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचा दबदबा होता.

बेदी, बीएस चंद्रशेखर, एस. वेंकटराघवन आणि एरापल्ली प्रसन्ना हे भारताच्या फिरकी गोलंदाजीच्या इतिहासातील क्रांतीचे अभियंते मानले जातात. त्यामधील बेदी यांच्यासारख्या महान क्रिकेटपटूने सोमवारी जगाचा निरोप घेतला आहे.

### कॉ. पानसरे यांच्या नातवाचे अपघाती निधन

✔ **अहमदनगर** : दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे यांचे नातू अमित स्मिता बन्सी सातपुते यांचे रविवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास अपघाती निधन झाले. त्यांचे वय ३३ वर्षे होते. ते पोल्ट्री व्यावसायिक होते.

## ऊस गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून

✔ सुराज्य/मुंबई



बराच काळ झालेल्या चर्चा-मागण्यांनंतर अखेर राज्यातील ऊस गाळप हंगाम येत्या एक नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. गेल्या वर्षी देशात सर्वाधिक साखर उत्पादन करणाऱ्या महाराष्ट्रात यंदा मात्र उसाअभावी उत्पादन घटण्याची शक्यता आहे. उसाच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांना गेल्या वर्षीच्या तुलनेत उसाला अधिक दर मिळणार आहे.

गेल्या आठवड्यापर्यंत राज्यात २१७ साखर कारखान्यांनी गाळप हंगाम सुरू करण्यासाठी साखर आयुक्तालयाकडे अर्ज सादर केले होते. त्यामध्ये ११० सहकारी आणि १०७ खासगी साखर कारखान्यांचा समावेश आहे. विविध कारणांमुळे यंदा गाळपासाठी कमी ऊस उपलब्ध होणार आहे. त्यामुळे साखरेचे उत्पादनही कमी होण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षी राज्यात १०५ लाख टन, म्हणजे देशात सर्वाधिक साखरेचे उत्पादन झाले, त्यापाठोपाठ उत्तर प्रदेशाचा क्रमांक होता. यंदा साधारण १४ लाख हेक्टरवर उसाची लागवड झाली आहे. साधारण १०७८ लाख टन इतका ऊस असून, त्यापैकी साधारण ९७० लाख टन ऊस गाळपासाठी उपलब्ध होईल, असा अंदाज आहे. त्यातून १५ लाख टन कच्ची साखर इथेनॉलसाठी वळविण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यात सुमारे ८९ लाख टन इतक्या साखरेचे उत्पादन होईल, असा अंदाज सरकारने व्यक्त केला आहे.

उसाच्या टंचाईमुळे ऊस पळवापळवी होण्याची भीती आहे. विशेषत: कोल्हापूर-सांगली भागात हा प्रश्न आहे; तसेच ऊस तोडणी कामगारांच्या टोळ्याही कर्नाटकातच जातील, असेही सांगण्यात येत आहे. मात्र, कर्नाटकातही दसऱ्याचा सण असल्याने दोन्ही राज्यांत बरोबरच हंगाम सुरू होईल, असे कारखाना संघटनांचे म्हणणे आहे.

### दरांची स्थिती काय राहणार?

टंचाई असल्यामुळे यंदा उसाला दर चांगला मिळणार आहे. कारखान्यांमध्ये ऊस दराची स्पर्धा होऊन उत्पादकांना फायदा होईल, असे चित्र आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत सहाशे ते सातशे रुपये अधिक दर मिळण्याची शेतकऱ्यांना आशा आहे. गेल्या वर्षी तुटलेल्या उसाला चार हजार रुपये दर मिळावा, यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन सुरू आहे. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. माजी खासदार राजू शेट्टी यांची या प्रश्नावर पदयात्रा सुरू असून, त्यानंतर संघटनेची ऊस परिषद होईल. त्यात यंदाच्या दराबाबत मागणी करण्यात येईल. उसाची टंचाई आणि साखरेच्या कमी उत्पादनामुळे यंदा सर्वसाधारण ग्राहकांसाठी मात्र सणासुदीच्या काळात साखरेचे दर चढेच राहण्याची शक्यता आहे. गेल्या सप्टेंबरमध्ये या दरांनी उच्चांक गाठला होता. त्या पार्श्वभूमीवर सरकारनेही साखरेवरील निर्यातबंदी ३१ ऑक्टोबरनंतरही कायम ठेवली आहे.

# पाणीदार खासदार





माढा लोकसभा मतदारसंघ हा पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळी मतदारसंघ म्हणून ओळखला जात होता. खरंतर देशाचे नेते म्हणून ज्यांना ओळखले जाते, असे लोकप्रतिनिधी या मतदारसंघातून निवडून जाऊन सुद्धा शेती पाण्याचा प्रश्न सुटू शकला नव्हता. परंतु २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांनी आगामी २०२४ ची निवडणूक ही पाणी प्रश्नावर होणार नाही, असा शब्द मतदारसंघातील जनेतला दिला आणि तो त्यांनी खरा करून दाखवला. ४ तालुक्याचा पाण्याचा प्रश्न असणारा नीरा–देवघर प्रकल्पास महाराष्ट्र शासनाची सर्व पुर्तता करुन घेतली. सांगोला तालुक्यातील टेंभू योजना, सांगोला उपसा सिंचन, म्हैसाळ योजनेतून वंचित गावाचा समावेश, कोरडा व कासारी येथे बंधारे, करमाळा तालुक्यातील मांगी, पोंदवडी, रिटेवाडी योजना तथा माढा या तालुक्यातील खैराव मानेगांव, कुकडी प्रकल्पांतर्गत सीना–माढा उपसा सिंचन या सर्व योजना मार्गी लावल्या. त्यामुळेच संपूर्ण मतदारसंघात खा. रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांची ओळख पाणीदार खासदार म्हणून झाली आहे.



## कृष्णा खोरे फ्लड डायव्हर्शन प्रोजेक्टला मान्यता

कृष्णा भिमा स्थिरीकरण प्रकल्पतातून मतदारसंघामध्ये सिंचनासाठी व पिण्यासाठी पाणी कसे नेता येईल, यासाठी कृष्णा खोरे फ्लड डायवर्षण या प्रोजेक्टच्या सर्व्हेसाठी मान्यता मिळवून घेतली. फलटण तालुक्यातील धोम बलकवडी हा प्रकल्प चारमाही होता. त्यामुळे त्या ६७ गावांमध्ये फक्त चारचं महिने पाणी उपलब्ध होत होते. त्यानंतर त्या भागातील शेतकऱ्यांना दुष्काळाला सामोरे जावे लागत होते. ही बाब त्यांच्या लक्षात आल्यानंतर निरा देवघरमधून धोम बलकवडीमध्ये पाणी उचलून आठमाही करण्यासाठी खा. निंबाळकर यांनी प्रयत्न केले.




नीरा-देवघर, जिहे कठापूर योजनेस केंद्र सरकारकडून मान्यता दिल्याबद्दल खासदार रणजितसिंह नाईक- निंबाळकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सत्कार करुन मतदारसंघाच्यावतीने आभार व्यक्त केले.



## मुंबई ते बंगळुरू नवीन ग्रीन कॉरिडॉर हायवेला मान्यता घेतली

केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी मुंबई ते बंगळुरू या नवीन ग्रीन कॉरिडॉर हायवेला मंजुरी दिली आहे. त्यांच्याकडे पाठपुरावा करुन नवीन हायवे हा दुष्काळी पट्ट्यातून गेला पाहिजे, अशी आग्रही भूमिका घेऊन फलटण, माण, खटाव या दुष्काळी तालुक्याचा विकास व्हावा,या भागामध्ये आर्थिक सुबत्ता यावी, यासाठी प्रयत्न करताना खासदार निंबाळकर दिसत आहेत.

## शेतीचा अभ्यास करूनच उत्पादन




शेती करत असताना हवामान कसे आहे, जमीन कशी आहे. जमिनीचा प्रत्येक बारकाईने अभ्यास केला. त्याला पोषक असे पीक कशा पद्धतीने घेता येईल, याचा तज्ज्ञांमार्फत अभ्यास केला. त्या-त्या भागात तेथे पीक घेण्यासाठी मार्गदर्शन आणि मदत केली जाणार आहे. कमी शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना आंतर पिकासारख्या उपायातून त्यांची ही उत्पादनक्षमता कशा पद्धतीने वाढवून घेता येईल, याबाबतही मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## युवकांच्या हाताला काम



मतदारसंघातील पाणी प्रश्नाबरोबरचं युवकांच्या हाताला काम असले पाहिजे, म्हणून प्रयत्न करुन नाईकबोमवाडी व म्हसवड येथे नवीन एमआयडीसी मंजुर करुन आणली. लवकरचं काम सुरु होऊन तेथे हजारो युवकांना काम मिळणार आहे. माण तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असणारी कॉरिडॉर एमआयडीसी केंद्र शासनाच्या माध्यमातून मंजूर करुन घेतली आहे. येत्या काही वर्षात त्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणामध्ये रोजगार उपलब्ध होणार आहे.

## वडिलांचे स्वप्न; मुलाकडून स्वप्नपूर्ती



खासदार नाईक-निंबाळकर यांचे वडील हे शिवसेनेचे खासदार होते. त्यांना अत्यंत कमी कालावधी मिळाला. त्यांचा पाणीप्रश्नाचा अभ्यास चांगला होता. पाण्याचा प्रश्न आणि फलटण लोणंद हा रेल्वे मार्गाचा प्रस्ताव त्यांच्या वडिलांनीच तयार केला होता. मात्र त्याला मंजुरी मिळू शकली नव्हती. नाईक-निंबाळकर हे खासदार झाल्यानंतर शपथविधीनंतर बारा दिवसातच त्यांनी फलटण-लोणंद रेल्वे मार्गाला मंजुरी मिळवून वडिलांच्या स्वप्नाची स्वप्नपूर्ती केली.

## शेती विकासाला गती देणार

माढा मतदारसंघात पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी कुठे नाले, बंधारे बांधायचे आहेत त्याचे सर्वेक्षण करून ती बांधली जाणार आहेत. तसेच किसान ट्रेन पूर्वत सुरू केली जाणार आहे. तसेच पंढरपूर रेल्वे सुरू करण्याचा प्रयत्न सुरू आहे

## २०२४ ला पुन्हा येणार

माढा मतदारसंघात आजपर्यंत केलेली कोट्यवधी रुपयांची विकासकामे, मतदारसंघातील सर्वच नेत्यांबरोबर असलेले सलोख्याचे संबंध आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची असलेली खंबीर साथ यामुळे पुन्हा २०२४ मध्ये आपण पुन्हा माढा मतदारसंघातून निवडून येणारच, असा विश्वास निंबाळकरांनी व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेला माढा मतदारसंघ खा.निंबाळकरांनी भाजपकडे खेचून आणला. आता दुसऱ्यांदा हा मतदारसंघ ताब्यात घेण्याची संधी भाजपला आहे. खा.निंबाळकरांनी केलेली विकासकामे आणि राष्ट्रवादीने दिलेली भाजपला साथ यामुळे भाजपचा विजय येथून निश्चित मानला जात आहे. गत लोकसभा निवडणुकीत ज्यांनी निंबाळकरांच्या विरोधात प्रचार केले असे आमदार बबनदादा आणि आमदार संजयमामा शिंदे यांनीच आता खासदार निंबाळकर यांना माढा आणि करमाळा या मतदारसंघातून



लाखांचे मताधिक्य देऊ, अशी हमी दिली आहे. यावरुनच खासदार निंबाळकर हे शत्रुला ही मित्र बनवण्यात यशस्वी ठरले, हे दिसून येते. हीच मोठी जमेची बाजू खासदार निंबाळकर यांची आहे. त्यामुळेच २०२४ ला ते पुन्हा एकदा माढा मतदारसंघातून निवडून येणार असा विश्वास ते बाळगून आहेत.

## मित्राच्या विरोधात लोकसभा लढवली



माढा मतदारसंघातून रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी अपक्ष निवडणूक लढवावी यासाठी सुरुवातीच्या काळात संजयमामा शिंदे, आमदार प्रशांत परिचारक, जयकुमार गोरे यांनी प्रयत्न केले. त्यांनी पुढाकार घेऊन पाठिंबा दिला परंतु पुढे जाऊन राजकीय समिकरणे बदलून माढा मतदारसंघात निंबाळकर यांच्यासमोर संजयमामा शिंदे राष्ट्रवादीकडून उमेदवार म्हणून उभे राहिले.परंतु या निवडणुकीत मैत्रीपूर्ण लढत होऊन निंबाळकर हे विजयी झाले त्यानंतरही संजय मामांसोबत कसलाही वैयक्तिक रोष ठेवला नाही. निंबाळकर यांनी त्यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंध आजही जपले आहेत.

## काँग्रेस–राष्ट्रवादी युतीमुळे काँग्रेसला बाय



जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी माढा मतदारसंघातून अपक्ष का होईना, निवडणूक लढवण्याचा निर्णय खा. निंबाळकर यांनी घेतला होता. काँग्रेस आणि राष्ट्रवादीची युती असल्याने काँग्रेसला सोडून भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. माढा मतदारसंघ राष्ट्रवादीकडे असल्याने काँग्रेसला बाय करत तो पक्ष सोडला आणि तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजप प्रवेश केला.



गत लोकसभा निवडणुकीवेळी मतदारसंघातील जनतेला मी शब्द दिला होता. नीरा-देवघर प्रकल्पाच्या पंतप्रधान कृषी योजनेत समावेश झाल्यामुळे तो शब्द पूर्ण करण्यात मी यशस्वी झालो आहे. यामुळे दुष्काळी भागातील पण्याचा प्रश्नही मिटण्याची शक्यता आहे. काम करत असताना मी कधीही निवडणुकीपुरता विचार करत नाही. नीरा-देवघर प्रकल्प राज्य आणि केंद्र सरकारच्या भागीदारीतून पूर्ण करण्यात येणार आहे. यात राज्य सरकारचा हिस्सा हा ४० टक्के, तर केंद्र सरकार ६० टक्के रक्कम प्रकल्पाच्या पुर्णत्त्वासाठी देणार आहे. पैकी राज्य सरकारच्या हिश्याची ४० टक्के रक्कम उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केली असून, निधीही उपलब्ध करून दिला आहे. त्याचे टेंडरसुद्धा झाले आहे, त्यामुळे लवकरात लवकर कामाला सुरुवात होणार आहे, असेही खासदार निंबाळकर यांनी स्पष्ट केले.







खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना आता माढा मतदारसंघ जिंकणे सोपे झाल्याचे मानले जात आहे. माढाचे आमदार बबनदादा शिंदे, करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे, माण खटावचे आमदार जयकुमार गोरे, सांगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील आणि माळशिरस तालुक्यातील उत्तमराव जानकर यांचा भक्कम पाठिंबा खा.रणजितसिंह निंबाळकर यांना मिळाला आहे. या सर्वांनीच निंबाळकर यांना मोठे मताधिक्य देऊ असा निश्चय केला आहे आणि तो सर्वांना बोलूनही दाखवला आहे. त्यामुळे खासदार रणजितसिंह निंबाळकर गतवेळीपेक्षा यंदाच्या निवडणुकीत मोठ्या फरकाने विजयी होतील, असे आता त्यांचे समर्थक बोलत आहेत. माढा लोकसभा अंतर्गत येणाऱ्या सहा विधानसभा मतदारसंघामध्ये भाजप शिवसेना आणि अजितदादा यांची राष्ट्रवादी मिळून तब्बल पाच आमदार आहेत. त्यामुळे विरोधकांना येथे उमेदवार मिळणे ही कठीण होणार असल्याचे बोलले जात आहे.